शुक्रवार, १ डिसेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ११२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक


MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 1 DECEMBER. 2023 • adhunikkesari.com • Adhunik Kesari • YEAR-03 • ISSUE-112 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05


चर्चेतली बातमी

## उत्तरकाशी बचाव मोहिमेवर अक्षय कुमार काढणार चित्रपट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उत्तराखंडमध्ये चारधाम प्रकल्पाचा भाग असलेल्या



सिलक्यारा ते बारकोट या पाच किलोमीटरच्या बांधकामाधीन बोगद्याचा काही भाग १२ नोव्हेंबरला कोसळला. बोगद्याच्या सिलक्यारा दिशेकडील सुमारे ६० मीटरचा भाग खचल्याने ४१ कामगार अडकले होते. या मजुरांना बाहेर काढण्यासाठी सर्वात मोठे तज्ञ म्हणून ओळखले जाणारे अर्नोल्ड डिक्स यांना पाचारण करण्यात आले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हे बचावकार्य पार पडले असून त्या ४१ मजुरांना बाहेर काढण्यात आले आहे. भारतातच नव्हे तर जगभरात या गोष्टीची चर्चा होत आहे. सोशल मीडियावर तर खूप लोकांनी याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमारने याबद्दल एक्स या प्लॅटफॉर्मवर ट्वीट करत संपूर्ण बचावकार्य पार पाडणाऱ्या लोकांचे आभार मानले असून त्यांचे कौतुक केले. आता याच ट्वीटमुळे अक्षय कुमार पुन्हा एकदा ट्रोलर्सच्या निशाण्यावर आला आहे. सत्यघटनेवर आधारित अक्षय कुमार चित्रपट काढतो अन् यामुळेच आता अक्षय लवकरच या बोगद्यातील बचाव कार्यावरील चित्रपट काढणार अशी चर्चा रंगू लागली आहे. चित्रपटाचे नाव 'द टनलमॅन' असेल असंही काहींनी खोचकपणे ट्वीट करत लिहिले आहे. अक्षयचे ट्वीट शेअर करत यावर चित्रपट कधी काढणार असाही काहींनी सवाल केला आहे. बायोपिक आणि सत्यघटनेवर आधारित चित्रपटांसाठी ओळखल्या जाणाऱ्या अक्षय कुमारला चांगलेच ट्रोल केले जात आहे.

## जरांगे पाटील अजून लहान आहेत : राणे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कुठल्याही राजकीय नेत्याने मराठा आणि ओबीसी अशी झुंज लावून देऊ नये. आमच्या समितीने जेव्हा आरक्षण दिले होते तेव्हा कुणाचे आरक्षण काढून द्या, असे नाही. मात्र कुणाचंही आरक्षण काढून मराठ्यांना द्यावे या मताचा मी नाही. मनोज जरांगे पाटील यांनी अभ्यास करावा ते अजून लहान आहेत. आरक्षण कसे मिळते? भारतीय घटनेत काय तरतुदी आहेत त्यांच्याविषयी वाचावे. मराठ्यांना विचारावे ते ओबीसी आरक्षण घ्यायला तयार आहेत का? मराठा समाज ओबीसींचे आरक्षण कधीही घेणार नाही, असे केंद्रीय मंत्री नारायण राणेंनी म्हटले आहे. पुण्यात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केले. मराठा आरक्षणावरुन सध्या मनोज जरांगे पाटील आक्रमक झाले आहेत. त्यांच्या महाराष्ट्रातल्या तिसऱ्या टप्प्यातल्या सभाही आता लवकरच सुरु होतील. याबाबत प्रश्न विचारला असता नारायण राणेंनी मनोज जरांगे पाटील लहान आहेत, असे म्हटले आहे. मराठा आरक्षणावर मी काही भविष्यवाणी वर्तवू शकत नाही. मी मगाशीही स्पष्ट केले आता पुन्हा सांगतो, कुणाचेही आरक्षण काढून मराठ्यांना आरक्षण न देता ५२ टक्क्यांच्या वर भारतीय घटनेच्या १५/४ प्रमाणे आरक्षण द्यावे. मागास आयोगाकडे पाठवावे, त्याचा सर्व्हे केला जावा. त्यानंतर सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या मराठा समाजाला आरक्षण दिले जावे हे माझे मत आहे.

## 'बोल्ला काली पूजे'साठी १० हजार बोकडांचा बळी

### विरोधात हायकोर्टात याचिका दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**कोलकाता :** बोल्ला काली पूजेसाठी १० हजार



बोकडांचा बळी देण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर कोलकाता उच्च न्यायालयात सुनावणी झाली. चीफ जस्टिस टीएस शिवगणनम आणि जस्टिस हिरमण्य भट्टाचार्य यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या वकिलांना विचारले की पश्चिम बंगालमध्ये बकऱ्यांचा बळी देण्यावर काही प्रतिबंध आहे का? किंवा असे बळी जाऊ नयेत म्हणून काही कायदा आहे का? त्यावर हा तर्क देण्यात आला की तक्रार अशी नाही. मात्र पश्चिम बंगाल पशू वधन नियम १९५० अन्वये पशू वैद्यकीय चिकित्सकांनी बोकडाची तपासणी करुन ती बळी देण्यायोग्य आहे की नाही हे सांगावे. वकिलांनी यावर सांगितले या बोकडांचा बळी बोल्ला काली पूजेसाठी दिला जातो. सध्या न्यायालयाच्या आदेशांमुळे आणि केंद्र सरकारने मंजूर केलेल्या धोरणामुळे मागच्या दोन वर्षांपासून या पूजेच्या दिवशी बळी देण्याची प्रथा स्थगित करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी हे देखील सांगितले की दिनाजपूर या ठिकाणी बोल्ला काली मंदिर आहे. या मंदिराने आता घोषणा केली आहे की एकाचवेळी दहा हजार बोकडांचा बळी आम्ही देणार आहोत. राज्यभरात देवाची अशी काही मंदिरे आहेत जिथे बोकडांचा बळी दिला जाणार आहे.

खंडपीठाने हे म्हणणं ऐकून घेतल्यानंतर हे प्रकरण शुक्रवारी सूचीबद्ध करण्याचे निर्देश दिले. तसंच याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी उद्या जे जे त्यांचं म्हणणं मांडणार आहेत त्यांना शुक्रवारी न्यायालयात हजर करावे, असेही सांगितले. या प्रकरणी शुक्रवारी सुनावणी होणार आहे.

# मराठा समाजाच्या प्रचंड विरोधानंतर मंत्री छगन भुजबळ बॅकफूटवर

## मला अडवून दाखवापासून ग्रामस्थांना नको असेल तर जाणार नाही ते अर्धवट दौरा सोडून प्रस्थान...

आधुनिक केसरी न्यूज


किरणकुमार आवारे


निफाड : नाशिक जिल्ह्यात अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे तसेच फळबागांचे अतोनात नुकसान केले आहे. त्यामुळे येवला लासलगाव मतदार संघातील गावांचा दौरा करण्यासाठी मंत्री भुजबळ येवल्यात आले असून सुरवातीला 'मला अडवून दाखवा' असे म्हणणाऱ्या मंत्री भुजबळ यांनी मराठा समाजाच्या प्रचंड रोषामुळे 'ज्या गावातील ग्रामस्थांना नको असेल तर जाणार नाही' अशी भूमिका घेतली. मात्र त्यांच्या दौऱ्यात मराठा समाजाचा प्रचंड रोष बघता त्यांना दौरा अर्धवट सोडावा लागला.

काल दि.२९ रोजी रात्री भुजबळ येवला मुक्कामी होते. मात्र तेथील संपर्क कार्यालयाला प्रचंड असा अतिरिक्त बंदोबस्त होता. काल झालेल्या पत्रकार परिषदेत भुजबळ यांनी, ' मी दौरा करणारच असून मला अडवून दाखवा' असे अवाहन केले होते मात्र, आज सकाळी येवल्याच्या विंचुर चौफुली जवळ मराठा कार्यकर्ते जमा झाल्याचे पाहून त्यांना मार्ग बदलावा लागला. तालुक्यातील सोमठाणजोश या



गावात त्यांचा आज पाहणी दौरा होता मात्र, रात्रीपासून तेथे कार्यकर्ते जमा झाले होते. तेथील मराठा कार्यकर्त्यांनी काल भुजबळ यांना दूरध्वनी करून, 'जमिनीचे उतारे आमच्या बापाच्या नावाने असून आम्हाला मदत मिळाली नाही तरी चालेल मात्र तुम्ही आमच्या गावाला येऊ नका' असे आवाहन केले. ही ऑडिओ क्लिप प्रचंड व्हायरल झाली. त्यानंतर आज सोमठाणे येथील दौऱ्यात मराठा कार्यकर्त्यांनी भुजबळ यांना काळे झेंडे दाखवत प्रचंड अशी घोषणाबाजी केली. त्यामुळे भुजबळ यांना तेथे थांबता आले नाही. भुजबळ यांचा ताफा गेल्यानंतर मराठा कार्यकर्त्यांनी मार्ग गोमुत्र शिंपडून पवित्र केला. भुजबळ यांना येवला लासलगाव मतदार संघातील निफाड तालुक्यातील गावांमध्येही मराठा समाजाच्या रोषास सामोरे जावे लागले. येवला तालुक्यातून निफाड तालुक्यातील कोटमगावकडे आल्यानंतर सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी भुजबळांना काळे झेंडे दाखवले. त्यानंतर, 'भुजबळ गो बॅक' च्या घोषणा दिल्या. या कार्यकर्त्यांनी ताफा अडवण्याचा प्रयत्न केला. पण, पोलिसांनी कार्यकर्त्यांना भोवतीकडे केले होते. त्यामुळे ताफा पुढे जाताच कार्यकर्त्यांनी पोलिसांचे कडे तोडत पुढे जाण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी त्यांना रोखले. मराठा समाजाचा प्रचंड रोष बघता मंत्री छगन भुजबळ हे अर्धवट दौरा सोडून शहापूर कडे रवाना झाले. मराठा समाजाचा ठिकठिकाणी होणाऱ्या आंदोलनानंतर भुजबळांनी दौरा गुंडाळल्याची चर्चा आहे. येवल्यानंतर निफाड तालुक्यात छगन भुजबळांचा पाहणी दौरा होता. पण, ते ओबीसी समाजाच्या शहापूर मधील आंदोलनाला भेट देऊन कर्जत येथे होणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यक्रमासाठी भुजबळ रवाना झाले.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

# ' मूर्ती ' घडवणारा शिल्पकार

आजच्या या स्त्री पुरुष समानतेच्या युगात स्त्रियांना ही संधी का नाकारली जावी हे तिला कळू शकले नाही. टेल्को ही टाटांची कंपनी आहे हे तिला माहीत होते. त्या कंपनीचे प्रमुख निश्चितच जे आर डी टाटा असणार असे वाटल्यामुळे तिने सरळ जे आर डीं ना त्या सात्विक संतापात एक पत्र लिहिले. पोलाद, स्टील, केमिकल्स इ क्षेत्रात काम करणारे आणि आपल्या वेगळ्या गुणवत्तेने आणि कार्यपद्धतीने देशविदेशात आपला ठसा उमटवणारे टाटा स्त्रियांना संधी का नाकारतात ? स्त्रियांना संधीच दिली गेली नाही, तर त्या आपली गुणवत्ता कशी सिद्ध करू शकतील ? अशा रीतीने सुधाचा सात्विक संताप त्या पत्रात प्रकट झाला होता. आपल्याला संधी तर मिळणार नाही, पण पत्र तर पाठवून देऊ या असा विचार करून तिने पत्र पोस्टात टाकले आणि ती त्याबद्दल विसरूनही गेली. पण आठ दिवसांनी एक आश्चर्य घडले. तिला चक्क टेल्कोकडून मुलाखतीसाठी बोलावणे आले होते एवढेच नव्हे तर जाण्यायेण्याचे प्रथम वर्गाचे भाडेही देण्यात येणार होते. तिला खूप आनंद झाला. नोकरी मिळेल न मिळेल पण पुणे ट्रीप तर होईल, असा विचार करून ती मुलाखतीसाठी गेली. जे आर डींच्या गुणग्राहकतेने सुधासारख्या तरुणीमध्ये असलेला स्पार्क हेरला होता. लक्ष घालून इतर उमेदवारांसोबत तिलाही कॉल लेटर पाठवायला लावले होते. ती जेव्हा मुलाखतीसाठी असलेल्या केबिनमध्ये शिरली तेव्हा तिच्याकडे पाहून ' हीच ती जे आर डींना पत्र पाठवणारी मुलगी ' अशी कुजबुज आणि तिच्याकडे चमत्कारिक पद्धतीने पाहणाऱ्या नजरा तिला दिसल्या. आता आपल्याला नोकरी मिळणार नाहीच याची तिला खात्री झाली आणि तिची सगळी भीती कुठल्या कुठे पळाली. न घाबरता तिने मुलाखत दिली. तिची सडेतोड मुलाखत पाहून तिची टेल्कोमध्ये निवड झाली आणि तिच्यामुळे इतर तरुणींसाठी टाटांच्या कंपन्यांचे प्रवेशद्वार उघडले. पुढे कामानिमित्ताने कधी कधी जे आर डींची तिची भेट होई. तेव्हा या एवढ्या मोठ्या माणसाला आपण असे पत्र लिहिले याची बोच कुठेतरी तिच्या मनामध्ये असे. पण जे आर डी म्हणजे निर्मळ मनाचा माणूस. जणू वाहती गंगा. त्यांच्या मनात काहीच राहत




नसे. त्यांच्या हसऱ्या निळ्या डोळ्यात राग, द्वेष कुठेच नसायचा. एकदा मुंबईला बॉंबे हाऊसमध्ये काम करत असताना आपले काम संपल्यानंतर त्या खाली थांबल्या होत्या. त्याच वेळेस जे आर डींचे तिथे आगमन झाले. त्यांनी विचारले की काम संपल्यानंतरही तुम्ही येथे का थांबला आहात ? तेव्हा त्यांनी सांगितले की माझे पती श्री नारायण मूर्ती मला नेण्यासाठी येणार आहेत. त्यांची वाट पाहत मी थांबली आहे. तेव्हा जे आर डी स्वतः नारायण मूर्ती येईपर्यंत त्यांच्याजवळ थांबले.



## आनंदी पहाट

# सामाजिक संबंधांची प्रत्येकालाच गरज

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

सामाजिक निरोगीपणाची इष्टतम पातळी राखणे हे आपल्याला इतरांशी निरोगी संबंध निर्माण करण्यास अनुमती देते. सहाय्यक सोशल नेटवर्क असल्याने आपल्याला विविध कौशल्ये विकसित करता येतात आणि सामाजिक परिस्थितीत आपण जसे आहोत तसेच सहजतेने वागू शकतो. सकारात्मक सोशल नेटवर्कने स्वतःला वेढून घेतल्याने आपला आत्मसन्मान वाढतो. सामाजिक तंदुरुस्ती आपल्याला संवाद, विश्वास आणि संघर्ष व्यवस्थापनास प्रोत्साहन देणाऱ्या सीमा निर्माण करण्यास सक्षम करते. भावनिक लवचिकता निर्माण करण्यासाठी चांगले सामाजिक कल्याण असणे महत्त्वाचे असते. आपले सामाजिक नाते आपल्या कठीण काळात आधार देऊ शकते. सामाजिक तंदुरुस्तीमध्ये निरोगी, पालनपोषण करून आश्वासक नातेसंबंध निर्माण करणे तसेच आपल्या सभोवतालच्या लोकांशी चांगले संबंध वाढवणे यांचा समावेश असतो. आपल्या शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनासह आपले सामाजिक जीवन कसे संतुलित करावे, हे शिकण्यासाठी जागरूक क्रिया महत्त्वाच्या असतात. सामाजिक तंदुरुस्तीमध्ये आपल्या जीवनातील इतर भागांसह रोमँटिक संबंधांच्या अद्वितीय गरजा संतुलित करणे देखील समाविष्ट असते. आपण सामाजिक तंदुरुस्तीकडे प्रवास सुरू करताच, आपल्याला कळते, की आपल्यामध्ये वैयक्तिक नातेसंबंध वाढवण्याची ताकद आहे. सामाजिक कल्याण राखणे आपल्याला सहानुभूती आणि सक्रियपणे ऐकण्याचा सराव करण्यास अनुमती देते. सामाजिक कल्याणासाठी आपला प्रवास सुरू करण्याचे अनेक मार्ग आहेत. अनेकांशी सामाजिकरित्या जोडले गेल्याने चिंता, नैराश्य, तणाव कमी करण्यास, स्वतःची किंमत वाढवण्यास, आराम प्रदान करण्यास, एकटेपणा टाळण्यास आणि आयुर्मान वाढविण्यात मदत होते. दुस-या बाजूला, मजबूत सामाजिक संबंध नसल्यामुळे एखाद्याच्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक आरोग्याला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. प्रत्येकाला स्वतःसाठी लोक जोडलेले असणे आवश्यक असते. आपण आपले जीवन इतरांसोबत व्यतीत करणे आवश्यक असते. आपले कुटुंब, मित्र, सहकारी परिवार म्हणजेच समाज असतो.



आधुनिक केसरी

## सारे चराचर | गोविंदाचे ||

जाणिला जयाने | आत्मरूप भाव ||
लाभे त्यासी ठाव | गोविंदाचा ||१||
सांगे माझा ज्ञाना | सगुण निर्गुण ||
रूप तेच जाण | गोविंदाचे ||२||
संसारी चकवा | भुलवी मनाला ||
आधार जीवाला | गोविंदु रे ||३||
आकळेना ज्ञान | गावेना वैराग्य ||
लीन झाले भाग्य | गोविंदाशी ||४||
एक राम कृष्ण | एक हरि हर ||
सारे चरा चर | गोविंदाचे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

कां तें निघोन जाणें चुकलें ।पुन्हां मागुतें लग्न केलें ।
तेणें अत्यंतचि मग्न जालें ।मन द्वितीय संमंधीं ॥६४॥
जाला द्वितीय संमंध ।सर्वेचि मांडिला आनंद ।
श्रोतीं व्हावें सावध ।पुढिले समासीं ॥६५॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
स्वगुणपरीक्षानाम समास दुसरा ॥२॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सदाचार व्यभिचार से, मूरुख से विद्वान ।
भोगी से योगी बने, फल सत्संग महान
।।५५।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/५५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सत्संगाच्या महान प्रभावाने व्यभिचारी मनुष्य सदाचारी होतो. मूर्खाचा विद्वान होतो तर भोगी योगी बनतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूप

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मला आज आनंद झाला आहे की मी नवव्या दशकांत पदार्पण करत आहे.मागच्या आठव्या दशकांत आपण ज्ञानदशक म्हणून अभ्यास केला. त्यामध्ये देवदर्शन, सूक्ष्म आशंकानिरूपण, सूक्ष्मभूतेनिरूपण, स्थूलपंचमहाभूते,स्वरूपाकाशभेदोनाम, दुश्चितनिरूपण, मोक्षलक्षण, आत्मदर्शन, सिध्दलक्षण शून्यत्वनिरसन या दहा समासाचा मला समजेल अशा सोप्या भाषेत अभ्यास केला. मी नेहमीचं म्हणते! लिहित असताना माझ्या हातून काही अधिक उणे झाले तर श्री समर्थ मला माफ करतील मी तो दास समर्थांचा, आजच्या काळाचा विचार केला तर समर्थांचे प्रत्येक शब्द जगण्यासाठी कसे आवश्यक आहेत,यावर विश्वास ठेवणे फार फार गरजेचे आहे.!!चला तर मग, आपल्याला संतांच्या शब्दरूपी पालख्या तनामनात साठवायच्या आहेत. एकीने व नेकीने या शब्दरूपी पालख्यांचे भोई व्हायचं आहे.


## समर्थ रामदास



समर्थांच्या वाङमयाचे मूल्यमापन भिन्न प्रकारे, अनेक दृष्टिकोनातून, अनेक विचारवंतांनी केले आहे. त्यांच्या एक एक वाङ्मय प्रकाराचा ऊहापोह करून त्या प्रकारच्या वाङ्मयातून समर्थ काय सांगतात, हे पहातानाही त्यांच्या भक्तीचे, शैलीचे, बुद्धिमत्तेचे कुणालाही कौतुक वाटावे. त्यांचा भाषावैभव स्वयंभू होता. त्यांना शब्दांची कधी वाणच पडली नाही. समर्थांनी साहित्य, कला, आरोग्य, जीवनशैली, निसर्ग, बांधकाम, उद्योग या विषयांवरही लिहिले आहे. जीवनाचे कोणतेही अंग समर्थांनी सोडलेले नाही. सर्वच क्षेत्रांत उच्च ध्येय गाठण्यासाठी, यश मिळवण्यासाठी काय करावे, याचे तपशीलवार मार्गदर्शन समर्थ करतात. असे अनेक विषय त्यांच्या साहित्यात आहेत. समर्थांची मराठी भाषा ही मोजक्याच पण ठसठशीत शब्दांत सर्व काही सांगणारी भाषा आहे. समृद्ध शब्दरचना, मराठी शब्दांची वैभवशाली उधळण, तर्कशुद्ध विचारांची रेखीव, नेटकी मांडणी आणि माणसाच्या जीवनाचे, अगदी छोट्या-छोट्या व्यवहारांचे सूक्ष्म निरीक्षण ( अन् त्याचे प्रकटीकरण ) ही समर्थांच्या साहित्याची आणखी काही वैशिष्ट्ये.

# भगवंताचे स्मरण हेच भक्तीचे रहस्य !

आधुनिक केसरी



‘ मी नाही, तू आहेस ’ हे जाणणे हीच खरी भक्ती होय. भक्तीचा विषय एक भगवंत ठेवला, की बाकी सर्वांचा विसर पडतो. भक्ती केली की चित्त निर्विषय होते, हे सांगावेच लागत नाही. स्वतःचे विस्मरण आणि भगवंताचे स्मरण हेच भक्तीचे रहस्य. भगवंताची प्राप्ती पाहिजे असेल तर भक्ती करावी. भगवंताच्या चरित्रात भक्तांच्या सर्व तऱ्हा आहेत. त्यामध्ये आपण कुठे तरी खासच बसू ! भगवंताने त्या सर्वांना समाधान दिले, मग ते आपल्याला का मिळणार नाही ? जग प्रगतिपर आहे हे खरे; पण पैसा, मुले, मान्यता वगैरे ऐहिक सुखांची वाढ होणे यालाच आपण प्रगती समजतो. भगवंताची भक्ती ही खरी प्रगती होय. ही प्रगती बाहेर दिसण्यासारखी नाही. भगवंतावाचून यश हे अपयशच समजावे. कित्येक वेळा अपयश हेच यश बनते; म्हणून अपयश आले तरी, ते भगवंताच्या इच्छेने आले असे समजून शांत राहावे. ‘भगवंत आहे ’ असे म्हणणे किंवा मानणे याचा अर्थ असा की, ही सर्व सृष्टी भगवंताने उत्पन्न केली आहे. त्या सृष्टीचे तो रक्षण आणि पालन करतो. सृष्टीमध्ये अनेक समूह आहेत, त्यांचेसुद्धा रक्षण आणि पालन तोच करतो. त्या समूहांपैकी आपण एक जीव आहोत, आणि आपलेही रक्षण आणि पालन तो सदा करीत आहे. खरे पाहिले असता प्रत्येक मनुष्य अद्वैताचाच अभ्यास करीत असतो. अद्वैतामध्ये नेणारे द्वैत आपल्याला पाहिजे आहे. भगवंत, म्हणजे सगुण परमात्मा, असा आहे की तो वेगळा दिसतो खरा, परंतु भक्ताला तो आपल्यासारखा करून घेतो. आई आणि मुलगा यांच्यामध्ये साम्य असते. मुलाचा आवाज आईला नेहमी गोडच लागतो, त्याप्रमाणे भक्ताचा आवाज भगवंताला गोड लागतो. शेताची राखण करण्याकरिता जसे काठीवर कांबळे घालून त्याचे सोंग करतात, तसेच सगुण उपासनेचे आहे. राखणदार हजर नसताना ते सोंग ज्याप्रमाणे शेताचे रक्षण करायला उपयोगी पडते, त्याचप्रमाणे निर्गुणाच्या अभावी परमात्म्याची आठवण करून देण्यासाठी सगुण हे उपयोगी पडते. डोंगराच्या माथ्यावर चढल्याशिवाय आपले पलीकडे असलेले गाव जसे आपल्याला दिसत नाही, तसे सगुणरूपमय झाल्याशिवाय निर्गुण होता येत नाही.

जो भगवंतावर अवलंबून आहे तोच खरा स्वतंत्र होय. भगवंताचा ध्यास लागणे म्हणजे तद्रूपच होणे होय. भगवंताची प्रीती याचेच नाव भक्ती. ‘ माझा त्राता, माझी काळजी घेणारा, माझे रक्षण करणारा आणि पालन करणारा तो भगवंत आहे ’ असे मानणे आणि तसे वागणे हीच भगवंताबद्दलची खरी अस्तित्वबुद्धी होय. आपले स्वतःवर जितके प्रेम आहे, त्याच्यापेक्षा जास्त प्रेम भगवंतावर करणे हीच खरी उपासना, आणि हेच जीवनाचे सर्वस्व होय.



भारताने पर्यटन वाढीसाठी प्रयत्न करायला हवेत पान ६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १ डिसेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# शेतकरी संकटात असताना शिंदेंच्या मंत्रिमंडळ बैठकीत फक्त कोरड्या घोषणा : नाना पटोले

## गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना आधी मदत द्या त्यानंतरच मंत्र्यांचे दौरे करा

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडलेला आहे, हे वर्ष शेतकऱ्याचे मोठे नुकसान करणारे ठरले आहे. नैसर्गिक संकटात अडकलेला शेतकरी सरकारकडे मदतीची आशा लावून बसलेला असताना भाजपा सरकार मात्र केवळ घोषणाबाजी व जाहीरातबाजी करत आहे. बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत केवळ कोरड्या घोषणा करण्यात आल्या. आता मंत्री नुकसानीचा दौरा करत आहेत, हा केवळ देखावा आहे. मंत्र्यांनी दौरे करावेत पण आधी शेतकऱ्याच्या हातात भरीव मदत द्या, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले. टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सातत्याने येणाऱ्या नैसर्गिक संकटाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. खरीप हंगामानंतर आता रब्बी हंगामही वाया गेला आहे. अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतमालाचे मोठे नुकसान केले आहे, शेतातील उभी पिके, द्राक्ष, संत्रा, कांदा, सोयाबिन, तूर, धान, कापूस सर्व पिकं वाया गेली आहेत. शेतकरी संकटात असताना सरकारने तात्काळ मदत जाहीर करून ती शेतकऱ्यांपर्यंत पोहवण्याचे काम केले पाहिजे पण सरकार मात्र पोकळ घोषणा करत आहे. याआधी जाहीर केलेली मदतही शेतकऱ्यांपर्यंत अद्याप पोहचलेली नाही. भाजपा सरकार हे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसत आहे. सरकारच्या तिजोरीतून विमा कंपन्यांचे खिसे भरले आणि आता शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची वेळ आली तर पिकविमा कंपन्या शेतकऱ्यांना पैसे देत नाहीत. शेतकऱ्यांना भरीव मदत मिळाली पाहिजे ही काँग्रेस पक्षाची मागणी आहे. काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, टोकाचे पाऊल उचलू नये. शेतकऱ्यांना मदत मिळेपर्यंत काँग्रेस पक्ष सरकारकडे पाठपुरावा करत राहिल. राज्यात मागील काही महिन्यांपासून आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भाजपानेच आरक्षणाचे आश्वासन दिले होते पण आता ते आरक्षण देण्यास चालढकल करत आहेत. आरक्षण प्रश्नावरून मराठा व ओबीसी समाजात जाणीवपूर्वक भांडणे लावली जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, शाहु, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्राला कलंक लावण्याचे काम भाजपा करत आहे. आरक्षण प्रश्नावरून मंत्रीमंडळातील मंत्र्यांची भांडणे ही सुद्धा सरकारचा ठरवून सुरु असलेला कार्यक्रम आहे. ही सर्व नौटकी सुरु असून राज्यातील जनतेला हे माहित आहे. सर्व जातींना आरक्षण मिळाले पाहिजे ही काँग्रेसची भूमिका आहे, त्यासाठी जातनिहाय जनगणना केली पाहिजे पण भाजपा सरकार ही जनगणना करत नाही.

**शिक्षकच नाहीत तर 'आदर्श शाळा' कसली?**

राज्यात १ .२५ लाख शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत पण सरकार त्या जागांची भरती करत नाही . भाजपा सरकार जिल्हा परिषदांच्या शाळा बंद करत आहे आणि दुसरीकडे मुख्यमंत्र्यांच्या नावाने आदर्श शाळा उपक्रमाची घोषणा करत आहे, हा सर्व हास्यास्पद प्रकार आहे . शाळेत शिक्षकच नाहीत तर आदर्श शाळा कसली ? असा प्रश्न नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे .

**पाच राज्यात काँग्रेसच विजयी होणार ...**

मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तिसगड, तेलंगाना व मिझोराम या पाच राज्यात विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या असून काँग्रेस पक्षाला या पाचही राज्यात जनतेचे मोठे समर्थन लाभले आहे . राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, खासदार राहुलजी गांधी व प्रियंकाजी गांधी यांनी या राज्यात झंझावाती प्रचार केला . पाचही राज्यातील वातावरण काँग्रेस पक्षासाठी अनुकुल आहे, त्यामुळे काँग्रेस पक्ष या पाचही राज्यात बहुतमाने निवडून येईल असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे .

# मामाच्या जागी मामी येईल, पण आमचे काय?

## चंद्रशेखर बावनकुळे यांचा आपल्याच सरकारला टोला

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्याच सरकारला टोला लगावला आहे. महिलांसाठी आरक्षणाचा कायद्यावरून बावनकुळे यांनी आपल्याच सरकारला टोला लगावला आहे. सरकारने महिलांसाठी आरक्षणाचा कायदा केला. पण आमचं विधानसभा निवडणुकीत काय होणार? आमच्या जागी महिला असल्या तर काय होईल? हे माहित नाही. पण मामाने तर जुगाड लावला आहे. मामाच्या जागी मामी राहील, या शब्दात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार सुरेश भोळे यांना उद्देशून भाषणातून फटकेबाजी केली. चंद्रशेखर बावनकुळे जळगावमध्ये बोलत होते.

देशाला वाचविण्याची काम महिलांनी केले. सावित्रीबाई फुले, झाशीची राणी ही उदाहरणं आमल्या समोर आहेत. हे डोळ्यासमोर ठेवून नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या आरक्षणाचा कायदा संसदेत पास केला. आरक्षणाचा फायदा होणार असल्याने देशात 191 महिला खासदार तर 100 महिला आमदार होणार आहेत. 33 टक्के जे महिलांना आरक्षण मिळाले. त्यामुळेच हे शक्य आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. दरम्यान, लोक तुमच्या सभांना गर्दी करतील. मात्र निवडणुकीच्या वेळी बटन हे कमळाच दाबतील, असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी विरोधकांना टोला लगावला आहे.

जळगवामध्ये असताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी खासदार रक्षा खडसे यांची भेट घेतली. त्यांच्या निवासस्थानी मुक्ताईनगरमध्ये जात बावनकुळेंनी रक्षा खडसेंची भेट घेतली. त्यांच्यासोबत चहा नाश्ता घेतला. तर रावेर लोकसभेच्या जागेबाबत मुक्ताईनगरमध्ये रक्षा खडसेंच्या घरी बंद दरवाजाआड चर्चा केल्याची सूत्रांची माहिती आहे.

एकनाथ खडसेसाहेब तुमच्यात धमक असेल तर इंडिया आघाडीतून बाहेर पडा. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे जाहीर भाषणात एकनाथ खडसे यांना आव्हान दिले होते. मात्र याच आव्हानानंतर बावनकुळेंनी एकनाथ खडसेंच्या सून रक्षा खडसे यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. बावनकुळे यांच्यासोबत खासदार रक्षा खडसे एकाच वाहनांमध्ये मुक्ताईनगरमधून रवाना झाले. त्यामुळे आगामी रावेर लोकसभेबाबत रक्षा खडसे यांच्या उमेदवारीबाबत चर्चा झाल्याची सूत्रांची माहिती समोर येत आहे.



# संजय राऊत औरंगजेबाच्या दरबारातले हुजरेच : ज्योती वाघमारे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुख्यमंत्री शिंदे यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या दत्ता दळवींना अटक करण्यात आली. दत्ता दळवी हे ठाकरे गटाचे नेते आहेत तसेच ते मुंबईचे माजी महापौरही होते. त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या मुद्द्यावरुन ठाकरे गट विरुद्ध शिंदे गट असा सामना रंगतो आहे. राज्यात नामर्दांचे सरकार आहे, असे संजय राऊत म्हणाले. तसेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचा उल्लेख त्यांनी सुलतान, डेप्युटी सुलतान असा केला. त्यावर शिंदे गटाच्या नेत्या ज्योती वाघमारे यांनी संजय राऊतांना प्रत्युत्तर दिले आहे. संजय राऊत तुम्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांना आणि उपमुख्यमंत्र्यांना सुलतान आणि डेप्युटी सुलतान म्हणत असाल ना तर याचा अर्थ तुम्ही अजून मोगलाईतून बाहेरच आला नाहीत. साडेतीनशे वर्षांची सल्तनत आणि सुलतानशाही संपवून छत्रपती शिवरायांनी याच महाराष्ट्रात स्वराज्य निर्माण केले. सुलतानाचे नाव घेणाऱ्या तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा अधिकार नाही. तुम्ही औरंगजेबाच्या दरबारातले हुजरेच आहात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने या देशात लोकशाही आणली, तुम्ही तर अजून मोगलाईचीच भाषा बोलत आहात. मग राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा द्या आणि पाकिस्तानचा पासपोर्ट काढून तिथे जा आणि खुशाल तिथल्या सुलतानांच्या दरबारात मुजरे करा. राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकरी हवालदील असताना मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री दुसऱ्या राज्यांमध्ये प्रचारात व्यग्र असल्याची टीका राऊतांनी केली आहे. अवकाळीचे संकट आस्मानातून कोसळत असताना आपले सुलतान आणि डेप्युटी सुलतान प्रचारात व्यग्र होते. कुणी छत्तीसगडमध्ये, कुणी तेलंगणात होते. जणूकाही ते गेले नसते तर तिथे निवडणुका थांबल्या असत्या. त्यांची मुख्य जबाबदारी होती इथून खोके नेऊन तिथल्या लोकांना सुपूर्त करायची. पण आपली ११ कोटी जनता संकटात असताना त्याबाबतीत त्यांना चिंता नाही, असे राऊत म्हणाले.


# रस्त्यासाठी स्वतःच्या रक्ताने लिहले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**सुजित सातपुते**



**माळशिरस :** भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष राहुल नरहरी मदने,पिलीव तालुका माळशिरस यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पिलीव ते माळशिरस रस्त्यासाठी स्वतःच्या रक्ताने पत्र लिहिले आहे. पिलीव ते माळशिरस हा २२ किलोमीटर अंतराचा रस्ता आहे. हा रस्ता अतिशय खडतर व निकृष्ट दर्जाचा झाला असून खड्ड्यात रस्ता आहे की रस्त्यात खड्डे हे आजपर्यंत कोणालाही न उलगडलेले कोडे आहे असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. माळशिरस हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे पंचायत समिती,कृषी कार्यालय,पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय यासह विविध कामांसाठी विद्यार्थ्यांची व सामान्य नागरिकांची रहदारी होत असते. रस्त्यात मोठ-मोठे खड्डे असल्याने या सर्व प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो.या मार्गावर अनेक लोकांचे अपघात झाले असून अपघातात अनेकांचे जीव गमावले आहेत तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे.आपल्या भारत देशाने गतवर्षी स्वतंत्रचा अमृत महोत्सव साजरा केला.परंतु पिलीव माळशिरस रस्त्याला खड्ड्यापासून स्वतंत्र्य मिळालेच नाही.जीव मुठीत धरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना दुर्दैवाने खड्डेच आम्हाला मिळाले अशी म्हणण्याची वेळ आली असल्याचे राहुल मदने यांनी सदरच्या पत्रामध्ये म्हटले आहे.मी हे स्वतःच्या रक्ताने लिहिलेले पत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना स्पीड पोस्टाने पाठवणार असून ते लवकरात लवकरच पिलीव माळशिरस रस्त्याचा प्रश्न मार्गी लावतील अपेक्षा असून यात तीळ मात्र शंका नसल्याचेही राहुल मदने यांनी माध्यमांशी बोलून दाखवले.






## ‘तूरकोंडी’

आधुनिक केसरी

भारतातील तूरटंचाईचा आणि जगभरातील तुरीच्या अल्प उपलब्धतेचा फायदा घेत मोझांबिकने भारताला होणाऱ्या तूर निर्यातीवर निर्बंध लागू केले आहेत. अतिरिक्त नफ्यासाठी मोझांबिक भारताची ‘तूरकोंडी’ करण्याच्या प्रयत्नात आहे. देशांतर्गत बाजारात पुढील वर्षभर तुरीच्या दरात तेजी राहणार असली, तरीही फारशी दरवाढ होण्याची शक्यता नाही. इंडियन पल्सेस अ‍ॅण्ड ग्रेन्स असोसिएशनचे अध्यक्ष बिमल कोठारी म्हणाले, की मोझांबिक भारताला तूर निर्यात करणारा सर्वांत मोठा देश आहे. देशाच्या एकूण आयातीत मोझांबिकचा वाटा ४० टक्के आहे. मागील आर्थिक वर्षी मोझांबिकमधून ४.६० लाख टन तुरीची आयात झाली होती. चालू आर्थिक वर्षात आजपर्यंत सुमारे दोन लाख टनांची आयात झाली आहे. जागतिक बाजारात तुरीची उपलब्धता कमी आहे. देशातील किरकोळ बाजारात तूरडाळीचे दर १९० रुपये प्रतिकिलोवर पोहचले आहेत. या टंचाईच्या स्थितीचा फायदा घेण्यासाठी मोझांबिकने आपल्या तूर निर्यातीत घट केली आहे. मोझांबिक सरकारमधील काही अधिकारी आणि व्यापाऱ्यांनी मिळून फक्त एकाच व्यापाऱ्यामार्फत निर्यात सुरू केली आहे. वाढीव दराने भारताला तूर निर्यात करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. यंदा देशात तूर लागवडीत घट झाली आहे. कमी पाऊस, गारपीट, अवकाळी सारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे तुरीच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. देशातील तूर डिसेंबर महिन्यात बाजारात येईल. म्यानमारमध्येही तुरीची काढणी सुरू झाली असून, म्यानमारची तूर जानेवारी महिन्यात देशाच्या बाजारात दाखल होण्याची शक्यता आहे. त्या शिवाय मालावी, इथोपिया आदी आफ्रिकी देशांतूनही आयातीचे नियोजन आहे. त्यामुळे पुढील वर्षभर दरातील तेजी कायम राहणार असली तरीही, तुरीच्या दरात अतिरेकी दरवाढ होण्याची शक्यता नाही. एकूण जागतिक उपलब्धता आणि देशांतर्गत उत्पादनाचा अंदाज पाहता वर्षभर तुरीची हातातोंडाशी गाठ राहणार आहे. अवेळी पावसामुळे नुकतेच तुरीचे मोठे नुकसान झाले आहे. देशात यंदा तुरीच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. जगभरातील अन्य देशांतही तुरीचे उत्पादनही कमी झाले आहे. संभाव्य दरवाढ रोखण्यासाठी केंद्र सरकार शेतकऱ्यांकडून हमीभावापेक्षा जास्त दराने म्हणजे बाजारभावाने तूर खरेदी करून साठा करीत आहे. पुढील वर्षभर तुरीची टंचाई राहण्याचा अंदाज आहे. या स्थितीची मोझांबिक सरकारला जाणीव असल्यामुळे ते अतिरिक्त फायद्यासाठी नियंत्रित निर्यात करताना दिसतात. मलावी, म्यानमार, इथिओपियातून तुरीची आयात करण्याचा पर्याय खुला आहे, अशी माहिती शेतीमाल बाजारभावाचे अभ्यासक श्रीकांत कुवळेकर यांनी दिली.

## बोगदा दुर्घटनेला कोण जबाबदार ?

आधुनिक केसरी

**१७ दिवसांच्या अथक प्रयत्नानंतर ४१ कामगार बोगद्यातून जिवंत परत आले.ही सर्वात मोठी आनंदाची गोष्ट आहे. पण यानिमित्ताने अनेक प्रश्न निर्माण होतात. उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील सिल्कयारा बोगदा दूर्घटनेच्या १७ दिवसानंतर संपूर्ण ४१ मजुरांना यशस्वीरित्या बाहेर काढण्यात आले. साठ मीटरच्या मलबा दूर करुन या मजुरांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आहे. १७ दिवस हे मजूर जिवन मृत्यूच्या खाईत होते.**

सतत १७ दिवस अंधार असलेल्या बोगद्यात या मजुरांनी रात्रंदिवस कसें जिवन जगले हे,त्यांचे त्यांनाच माहीत..मात्र धैर्य,साहस आत्मविश्वास आणि या कामगारांना बाहेर काढण्यासाठी जे नियोजन करण्यात आले ते खरच प्रशंसनीय होते..पण प्रश्न एक निर्माण होतो तो म्हणजे सिल्कयारा बोगदा दुर्घटनेला कोण जबाबदार? निसर्ग – विज्ञानाकडे दर्लक्ष ?की हलगर्जीपणा की नियमांकडे झालेले दुर्लक्ष? सिल्कयारा बोगदा करताना नेमकी कुठे चूक झाली ज्यामुळे ही दूर्घटना झाली, तेही आता समोर आले आहे. इंडिया टुडे ओपन – सोर्स इंटेलिजन्स (OSINT) यांनी सिल्कयारा येथे सुरु असलेल्या बोगद्याची पाहणी केली. यामध्ये अनेक नियम धाब्यावर बसवल्याचे समोर आले आहे. निसर्ग, विज्ञान आणि नियमांकडे कानाडोळा या ठिकाणी करण्यात आल्याचे लक्षात आले आहे. उत्तरकाशीतील सिल्कयारा बोगदा हा चारधाम योजनेचा भाग आहे. या योजनेंतर्गत ४.५ किलोमीटरचा बोगदा बनवला जात होता. हा बोगदा तयार झाल्यानंतर तीर्थाटनासाठी आलेल्या यात्रेकरुंचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी हा बोगदा तयार केला जातोय. मात्र या बोगद्याच्या निर्माण कार्यातच ४१ मजुरांचा जीव टांगणीला लागला होता. या बोगद्याच्या निर्माणाचे काम नॅशनल हायवे अँड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडकडे आहे. बोगदा तयार करताना काही नियमांचे उल्लंघन करण्यात आले किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. उत्तरकाशी हा हिमालयाचाच भाग मानला जातो. हे ठिकाण मेन सेंट्रल थ्रस्ट (MCT) च्या जवळचे मानले जाते. MCT म्हणजे भारतीय टेक्टोनिक प्लेट आणि यूरेशियन प्लेट यांच्या एकत्र येण्यामुळे निर्माण होणारी ऊर्जा आहे. या संपूर्ण परिसर दोन हजार किलोमीटर लांब आहे. हिमालयाच्या उत्तरपश्चिमेकडून दक्षिणपूर्वपर्यंत हा परिसर आहे. येथे या दोन्ही प्लेट कायम एकमेकांना ढकलत असतात, ज्यामुळे थ्रस्ट निर्माण होते आणि त्यातून ऊर्जा निर्मिती होते. भूकंप होत राहातो. बोगदा तयार करतांना कुठले तंत्रज्ञान वापरले गेले होते? कुठले तंत्रज्ञान वापरायचे हे तिथल्या लोकल GEOLOGY वर अवलंबून आहे. DRILL BLAST METHOD DBM - ड्रिल करायचे, आतमधे डायनामाईट ठेवायचे, आणि उडवायचे पण यामधे तेव्हढे नियंत्रण नसते. ज्या भागांत हे काम सुरु होते त्या भागाचा अभ्यास केला असेल तर असे तंत्रज्ञान वापरणे योग्य नाही. तिथे TUNNEL BORING METHOD TBM वापरायला हवे होते.

(२) ४.५ कि मी लांबीच्या बोगद्यासाठी आपत्कालीन बाहेर पडण्यासाठी ( ESCAPE TUNNEL IN CASE OF EMERGENCY) कुठेही मार्ग नाही. आपत्कालीन बाहेर पडण्याचा मार्ग नसणे हा अक्षम्य हलगर्जीपणा आहे. सर्व प्रकारच्या सरकारी कागदपत्रात ESCAPE



TUNNEL चा उल्लेख असतांना ही प्रत्यक्षात तो नसणे हे काय दर्शवते?

(३) सिल्क्यारा च्या बाजूने असणाऱ्या बोगद्याच्या तोंडा पासून २०० मिटर पर्यंत (मेटल जाळी +सिमेंट काँक्रिटचा ) छताला सपोर्ट आहे, पुढे नव्हता (किंवा आधी होता, नंतर पडला, पुढे काही डागडूजी करण्याचा प्रयत्न झाला आणि त्याचा विपरिणाम म्हणून हा अपघांत झाला ? )आणि तिथेच ६० मीटरचा भाग कोसळला.

डोंगर पोखरल्यावर, वरचा/ बाजूचा भाग कोसळू नये यासाठी जो काही STRUCTURAL सपोर्ट दिला गेला आहे, दिला जाणार होता तो वर असलेल्या भल्या मोठ्या मातीला / दगडाला सर्व काळांत रोखून धरण्यास पुरेसा होता का? यासाठीच वरिल सर्वेक्षणाचा अभ्यास महत्वाचा आहे. उत्तरकाशी आणि आसपासच्या भागात १८०३ मध्ये७.८ रिश्टर स्केल आणि १९९१ मध्ये ७ तीव्रतेचे भूकंपाचे धक्का जाणवले होते. हा परिसर भूकंपप्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो. ज्या बोगद्यात ४१ मजूर अडकले होते त्या सिल्कयारा-बडकोट बोगद्याच्या खालीच बडकोट थ्रस्ट आहे. म्हणजेच एक प्रमुख फॉल्ट लाईन बोगद्याच्या भुगर्भात आहे. त्यामुळे येथील बोगद्याच्या सुरक्षिततेवर विश्वास ठेवता येणे अशक्य आहे. तज्ज्ञांचे मत आहे की, ज्या जमीन भूकंपप्रवण क्षेत्र आहे. जिथे वारंवरा भूकंपाचे धक्के जाणवतात. भूकंपाचा धोका जिथे पदोपदी आहे, आणि भूकंपामुळे जमीन हलू शकते, अशा ठिकाणी बोगदा तयार करणे म्हणजे मोठ्या अपघाताला निमंत्रण देणे आहे. अशा भागाला शीयर झोन म्हटले जाते. म्हणजे अशी जमीन जी मेंटल आणि क्रस्ट यांच्यामध्ये अतिशय पातळ असते. जमीनीचा हा भाग स्थिर नसतो. इथे झोनच्या दोन्ही बाजूंचे दगड हे वेगाने सरकत असतात. टनल सीस्मिक प्रेडिक्शन म्हणजे काय? टनल सीस्मिक प्रेडिक्शन म्हणजे बोगदा तयार करण्यापूर्वी त्या भागातील भूकंपच्या हलचालींचा आढावा घेणे, भूकंपाच्या तीव्रतेचा अभ्यास केला जातो. त्यासोबतच बोगदा तयार केल्यास किती तीव्रतेचा भूकंप सहन करु शकेल, याचीही पाहणी केली जाते. तज्ज्ञांचे मत आहे की सिल्कयार बोगदा तयार करताना टनल सीस्मिक प्रेडिक्शन (TSP) कडे लक्षच देण्यात आले नाही. टीएसपी तपासणीत १०० मीटर बोगदा तयार झाल्यानंतर त्याच्या पुढच्या भागाची स्थिती कशी असेल याची पाहणी, अभ्यास केला जातो. बोगदा किती मजबूत आहे, स्थीर राहिल की नाही, याची तपासणी केली जाते. सिल्कयारा बोगदा तयार करत असताना ११ ट्रेड यूनियन्स आणि सेक्टोरल फेडरेशनने या बोगद्याच्या कामातील अनेक त्रूटींवर बोट ठेवत नाराजी व्यक्त केली. यूनियनचे म्हणणे आहे की, कामाच्या ठिकाणी कोणतीही दूर्घटना होण्याचा अर्थ नियमांकडे पाठ फिरवण्यात आली आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या जीवावर बेतण्याची परिस्थिती निर्माण होऊ शकते. जसे १७ दिवसांपूर्वी झाले आणि ४१ मजुरांचा जीव धोक्यात आला. नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळेच हे घडले आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे बोगदा तज्ज्ञ अर्नाल्ड डिक्स म्हणाले, एस्केप टनेलची सध्याच गरज नव्हती. कारण संपूर्ण जगात जेव्हा बोगदा तयार केला जात असतो, तेव्हा हेच लक्षात घेतले जाते की हो बागदा कधीही पडणार नाही. किमान अशा पद्धतीने तरी नाही. हा अपघात वेगळ्या प्रकारचा आहे. एस्केप टनेल हे नेहमी शेवटी बनवले जातात. कारण अशा दुर्घटना घडल्या तर लोकांना सुरक्षित बाहेर काढले जाईल. बोगद्याच्या निर्मितीवेळेसच एस्केप टनेल कधीही बनवले जात नाहीत. हा मार्ग चीन सिमेजवळ नेतो. शस्त्र आणि सैन्याची ने आण करण्यासाठी आणि म्हणून देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही हा मार्ग बनत होता असे म्हटले जाते. पण गेल्या काही वर्षातच, या मार्गावर अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या घटनांत लक्षणीय वाढ झालेली आहे आणि अनेक वेळा मार्ग बंद ठेवावा लागला आहे. युद्धाच्या वेळी अशा बेभरवशाच्या मार्गावर विसंबून रहाणे परवडणारे नाही. CDP मुळे पर्यावरणास मोठी हानी पोहोचत आहे आणि ते जास्त चिंताजनक आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाला ( डोंगराला) आव्हान देणे विनाशाला आमंत्रण आहे.

## संसार हा शाश्वत नसून मायेचा विस्तार



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपण ज्याला संसार समजतो तो शाश्वत नसुन मायेचा विस्तार आहे .जे जे नशीवंत आहे तीच नेमकी माया असते आणि आपणं शाश्वत सोडून जे नशीवंत आहे त्या मागे धावतो . शाश्वत काय नशीवंत काय हे उमजलं तर जीवनात माया आपला प्रभाव आपल्यावर निर्माण करू शकत नाही.माया आपल्यावर जितकी जास्त स्वार आहे तितकेच अधिक आपण दुःखी होतो मा येचा विस्तार जितका मर्यादित तितकंच दुःख मर्यादित आणि मायेचा विस्तार जितका जास्त तितकंच दुःख जास्त म्हणून हाच विस्तार करत करत असताना जीवन ज्ञान समजलं तर फार अडचणी निर्माण होत नाहीत. नौका समुद्रात असुन देखील पाण्याच्या मोहापासून दुर असते आणि म्हणुनच नौका पैलतीरावर पोहचते.**

जर चुकुन नौकेत पाणी शिरले तर नौका बुडते त्याच प्रमाणे जीवनात मायेच्या पाशात आडकू नका नक्कीच हित होईल.संसारा हा माय रूपी भवसिंधु आहे.आणि माया आपल्याला खेळवते आणि आपलं आयुष्य डुबवते.परंतु हि बाब आपल्या वेळीच लक्षात येऊन सागारतील नौके सारखं सहीसलामत पैलतीरावर जाता आलं आहे. महासागरातील नौका हि असंख्य लाटा, अधुन मधुन समुद्रात उठणारी भयनक अशी वादळ ,सुसाट वारा या सारख्या, अनंत अशा संकटांने विचलित न होता आपला पैलतीरावर जाण्याचा प्रवास अगदी व्यवस्थित पणे हळूहळू पुर्ण करते .आणि समुद्रातील पाण्यामध्ये असणारी नाव ज्या प्रमाणे पाण्यात असुन सुद्धा नावेत पाणी प्रवेश करू शकत नाही. आणि नाव आपला जो नियोजित प्रवास आहे तो अगदी योग्य पद्धतीने कुठल्याही संकटा शिवाय पुर्ण करते .त्याच प्रमाणे आपण सुद्धा मानवी जीवन जगत असताना व या माया रूपी संसारात वावरताना तसेच या जगात फिरत असतान आपल्या आजूबाजूला असणार भौतिक मायारूपी पाणी हे आपल्या संसार रूपी नावे मध्ये प्रवेश करू शकले नाही पाहिजे तसेच बाह्य वातावरणाचा तसेच भौतिक जगाला आपल्या मध्ये प्रवेश करू दिला नाही पाहिजे. तर आपलं जीवन व्यवस्थित नौके प्रमाणे पैलतीरावर जाऊ शकते .म्हणजे आपलं जीवन हे नावे प्रमाणे असावं आपण पाण्या मध्ये चालणारी नाव कधी पाहिली आहे का आणि जर पाहिली असेल तर आपण लक्षपूर्वक आठवाव नौकेचा थोडासाच पृष्ठ भाग हा पाण्यात असतो .आणि वरच्या बाजुचा बहुतांश भाग हा पाण्यावर तरंगत असतो. म्हणजे नेमके काय तर पाण्यावर



समतोल साधण्यासाठी जे काही विशेष खास असे काला गुण आवश्यक आहेत. ते काला गुण नावे ने आवगत केले आहेत आणि म्हणूनच नौका पाण्यावर तरंगत प्रवाहाच्या दिशेने हळूहळू मार्गस्थ होते आणि आपल्या नियोजित मुक्कामाचे असणारे शेवटचे ठिकाण गाठते. त्याच प्रमाणे मानवाने सुद्धा आपली जीवन रुपी नाव हि मायारूप पाण्यात अशाच पद्धतीने तरंगायला हवी. जेणेकरून आपण मायारूपी जगात जीवन जगत असताना विविध साधनांचा वापर हा आपल्या विकासासाठी करून घेतला पाहिजे. परंतु हा वापर करून घेत असताना आपल्याला निरपेक्ष भावनेने पुढे जाता आलं पाहिजे. आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहोचता आलं पाहिजे .आणि याच दरम्यान आपण आपल्या वास्तविक धेय्य पर्यंत पोहोचत असताना या मायेच्या संसारिक गोष्टींना आपल्यामध्ये प्रवेश करू द्यायचा नाही. हेच महत्वाचे आहे जसं पाण्यात चालणारी नाव ही आपल्यामध्ये समुद्रातील अथांग पाणी शिरू देत नाही. त्याच प्रमाणे संसाराच्या पैलतीरावर जात असताना मायारूपी शक्ती चा प्रवेश आपल्या मध्ये झाला नाही पाहिजे .पाण्यात चालणारी नाव त्यामध्ये जर पाणी शिरले तर ती बुडण्याची दाट शक्यता असते आणि त्याच प्रमाणे संसार रुपी जीवनामध्ये जगत असताना त्या मध्ये मोहमाया शिरली तर मग मात्र संसार रुपी नाव हि नक्कीच बुडल्याशिवाय राहत नाही .आणि पर्यायाने जीवनातील मुक्ती चा प्रवास हा त्याच ठिकाणी थांबतो. हा प्रवास थांबवायचं नसेल आणि आपल्याला योग्य ठिकाणी पोहोचायचं असेल तर आपलं जीवन हे पाण्यात चालणाऱ्या नावे प्रमाणे असलं पाहिजे .आणि नियोजित ठिकाणी नाव ज्याप्रमाणे पोहचते त्याच प्रमाणे आपल्या आपल्या जीवनातील सर्व जबाबदारी कर्तव्य पुर्ण करुन पार पाडुन योग्य ठिकाणी पोहचता आलं पाहिजे. आपण जितक जास्तीत जास्त कृतीशील ज्ञान अर्जित करू तितक आपलं जीवन सहज आणि सुलभ होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (*According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अभियंता कृष्णा दळेचा सार्थ अभिमान : पद्माकरराव मुळे


## खोदकामात सी. एस. एम. एस. एस. छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्याचे योगदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** उत्तराखंडमधील सिलक्यारा बोगद्यामध्ये गेल्या १६ दिवसांपासून अडकलेल्या मजुरांची मंगळवारी सुखरूप सुटका करण्यात आली. सुटका करत असताना अंतिम टप्प्यात "रॅट होल मायनिंग' पद्धतीचा वापर यशस्वी ठरला असून त्यामुळे मजुरां पर्यंत पोहोचणे शक्य झाले आहे. सदर पद्धतीमध्ये मातीमध्ये अडकलेल्या ब्लेड कट करून मजुरांना बाहेर काढण्यात मदत झाली. सदर ब्लेड कट करण्याचे काम कांचनवाडी स्थित असलेल्या छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी कृष्णा भाऊसाहेब दळेचे योगदान लाभले आहे. बोगद्यात अडकलेल्या ४१ कामगारांना बाहेर काढण्यासाठी जगभरातील तज्ञ तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येत होती. या रेस्क्यू ऑपरेशनमध्ये पुण्यातील "सुरेश इंदू लेझर प्रायवेट लिमिटेड" कंपनीच्या टीमला पाचारण करण्यात आले. त्यात



कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक वर्धमान शहा व त्यांची टीमचे योगदान लाभले. यात त्यांची संपूर्ण टीम तीन दिवस बोगद्यात मुक्कामी होती. त्यात ऑप्लिकेशन इंजिनियर कृष्णा भाऊसाहेब दळे याचाही सहभाग होता. कृष्णा दळे हा वाहेगाव, ता. पैठण येथील रहिवासी असून त्याचे वडील कुंभार व्यवसाय तसेच शेती करतात तर आई सौ. मंदाबाई या घरकाम आणि मजुरी करतात. कृष्णाचा लहान भाऊ शिक्षण घेत असून एक बहीण विवाहित आहे. वडिलांना व्यवसायात हातभार लावून त्याने अभियांत्रिकीमध्ये मेकानिकल इंजिनीरिंगची पदवी प्राप्त केली. त्याने छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयातून २०१७ मध्ये पदवी पूर्ण केलेली आहे. पदवी शिक्षणादरम्यान कृष्णा नेहमी सर्व तांत्रिक स्पर्धामध्ये सहभाग घेत असे. तसेच शैक्षणिक सत्रामध्ये तो विद्यापीठ परीक्षामध्ये अव्वल क्रमांकावर उत्तीर्ण झालेला आहे. कृष्णा सध्या सुरेश इंदू लेझर प्रायवेट लिमिटेड कंपनी, पुणे येथे मागील दोन वर्षापासून ऑप्लिकेशन इंजिनियर म्हणून काम करत आहे. त्यात त्याने विविध प्रकल्पावर काम केलेले आहे. बोगद्यामध्ये खोदकाम करताना ऑक्सिजनचे प्रमाण अत्यंत कमी आणि अल्प होते.



आमचा विश्वास आहे कि, विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्य घडवण्यात महाविद्यालयांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. कोर्पोरेट जगतातल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि जबाबदाऱ्या पेलण्यासाठी तयार असलेला तरुण इंजिनीयर घडवण्यासाठी आम्ही वचनबध्द आहोत. विद्यार्थी केंद्रित शिक्षणासोबतच आम्ही त्यांच चारित्र्य घडवण्यासाठी तसेच नैतिकमूल्यांची जपवणूक करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. भविष्यातील अडचणी आणि आव्हाने यांना सामोरे कसे जावे, याबद्दलची शिकवण आणि प्रशिक्षण आम्ही सातत्याने विद्यार्थांना देत असतो. श्री. कृष्णा दळे यांनी या मोहिमेत खारीचा वाटा उचलून CSMSS आणि देशाचे नाव उंचावले. त्यांचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. यापुढेही आमचे विद्यार्थी आणखीन कठीण परिस्थितीचा सामना करून यश संपादन करतील अशी खात्री आणि ठाम विश्वास वाटतो.
**श्री. पद्माकरराव मुळे, सचिव, छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर.**

तसेच बोगद्यामध्ये मशीनला जाण्यास अडथळा होता. त्यामुळे मशीनचे वेगवेगळे पार्ट करून सदरील मशीन बोगद्यामध्ये नेण्यात आली. तसेच त्यासोबत कृष्णानी स्वःत बोगद्यामध्ये उतरून मशीनचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्याने स्वत कंपनीच्या प्लाझमा कटिंग मशीनच्या साह्याने खोदकामातील अडथळे दूर केले. शैक्षणिक सत्राच्या अंतिम वर्षात शिकत असताना त्याने हिट ट्रान्स्फर संबधित विषयावर प्रोजेक्ट सादरीकरण केले होते, त्याचा फायदा त्याला या बचाव मोहिमेमध्ये झाला. कृष्णाच्या या कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष रणजित मुळे, सचिव पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, उपप्राचार्य डॉ. देवेंद्र भुयार, मेकानिकल विभागाचे विभागप्रमुख डॉ. रामचंद्र चोपडे, प्रा. सचिन लहाने यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# अजितदादांनी तुमच्या जिवावर महाराष्ट्र घडवण्याची जबाबदारी घेतलीय ती पार पाडूया : सुनिल तटकरे

आधुनिक केसरी न्यूज

**कर्जत :** अजितदादांनी तुमच्या जीवावर महाराष्ट्र घडवण्याची जबाबदारी घेतली आहे ती आपल्याला पार पाडायची आहे असे आवाहन राष्ट्रवादी कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी वैचारिक मंथन शिबीरात केले.
राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या वैचारिक मंथन शिबिराची सुरुवात आज कर्जत येथे झाली. भिन्न विचारसरणीचे वेगवगळे पक्ष देशात एकत्र येतात तर मग आम्ही शाहू - फुले - आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपत महायुतीच्या सरकारमध्ये सहभागी झालो तर आमचे काय चुकले असा सवालही सुनिल तटकरे यांनी उपस्थित केला.
अजितदादांमुळेच राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष उभा राहिला हे स्पष्टपणे ठणकावून सांगतानाच अजितदादांचे पक्षासाठीचे योगदान कोण विसरू शकत नाही असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.
'घड्याळ तेच वेळ नवी' या वैचारिक शिबीरातून नवी दिशा घेत पक्षाची भविष्यात वाटचाल करायची आहे असेही सुनिल तटकरे यांनी सांगितले. अजितदादांनी घेतलेला निर्णय कसा योग्य आहे हे कृतीतून दाखवून देऊया असे आवाहनही सुनिल तटकरे यांनी केले.
राष्ट्रवादी कॉँग्रेसचे ५३ पैकी ४३ आमदार अजितदादा पवार यांच्या पाठीशी उभे राहतात याचाच अर्थ आपल्या नेतृत्वाने केलेले काम समोर येते असेही सुनिल तटकरे म्हणाले.
सकल मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे ही पक्षाची भूमिका असल्याचे पुन्हा एकदा सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.
अजितदादा तुमची प्रत्येक हालचाल बातमी होते. पण राजकीय आजार घेऊन दादा घरात बसणारा नेता नाही हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे असेही सुनिल तटकरे यांनी ठणकावून सांगितले.
अजितदादांनी घेतलेली भूमिका किती योग्य आहे हे आपल्याला जनतेपर्यंत पोचवायचे आहे. मात्र काहीजण दादांनी सत्तेसाठी, यंत्रणांच्या भीतीपोटी भूमिका घेतली अशी टिका करत आहेत त्यालाही सुनिल तटकरे यांनी सडेतोड उत्तर दिले.
शिबीराच्या सुरुवातीला ध्वजारोहण राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या हस्ते पार पडले. यावेळी वैचारिक मंथन शिबीरामध्ये पक्षाचे अधिकृत गाणेही प्रसारित करण्यात आले.
या वैचारिक मंथन राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, कृषीमंत्री धनंजय मुंडे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मारावबाबा आत्राम, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला बालविकास मंत्री अदिती तटकरे, प्रदेश सरचिटणीस शिवाजीराव गर्जे, महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, सेवादल अध्यक्ष राजेंद्र लावंघरे, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, सामाजिक न्याय सेल प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राज्य समन्वयक ईश्वर बाळबुधे, अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष इद्रीसभाई नायकवडी आदींसह पक्षाचे आमदार, खासदार, पक्षाचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्ष, युवक, युवती, महिला, विद्यार्थी पदाधिकारी उपस्थित होते.

# आजची आमसभा रद्द, नागरिकांत नाराजी


## विकास कामे, समस्या जैसे थे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुकास्तरावरील आयोजित आजची दि. १ डिसेंबर वार्षिक आमसभा रद्द करण्यात आल्याने ग्रामस्थात नाराजी पसरली आहे.
पंचायत समिती कार्यालय खुलताबाद प्रांगणात गंगापूर -खुलताबाद मतदार संघाचे आमदार मा.प्रशांत भाऊ बंब यांच्या अध्यक्षतेखाली दि.१ रोजी वार्षिक आमसभा चे आयोजन करण्यात आले होते. यात तालुक्यातील वर्ष भर केलेली विकास कामे याचा आढावा तर वर्ष २०२४पुढील वर्षात करावयाचे विकास कामे चर्चा व आढावा घेण्यात येणार होते. तर तालुक्यातील विविध समस्या तक्रारी यावर चर्चा व निपटारा कामे तर जिल्हा परिषद शाळा, पंचायत समिती ग्रामसेवक,बँका ,कृषि विषायक कामे, अवकाळी पाऊस नुकसान मागच्या वर्षाची नुकसान,पुढे आधुनिक शेत व कार्य, रस्ते पुल कामे, डांबरीकरण मजबुतीकरण, दवाखाना आरोग्य केंद्र,विज महावितरण कंपनी, महसुल , पोलिस आदि विविध समस्या तक्रारी निवारण तोडगा तर पुढे विकास कामे यावर चर्चा व आढावा व निपटारा साठी आम सभा चे आयोजन करण्यात आले होते. व यासाठी सर्व सामान्य नागरिक पक्षीय कार्यकर्ते पदाधिकारी अधिकारी कर्मचारी यांची तयारी सुरू असतानाच . गटविकास अधिकारी पंचायत समिती यांनी आमसभा रद्द केल्याचे पत्र काढले त्यामुळे तालुक्यात नागरिकांत तीव्र नाराजी पसरली आहे. कारण अनेक तक्रारी नागरिकांच्या होत्या तर विकास कामे तेही निकृष्ट दर्जाहिन कामे,अधिकारी कर्मचारी नागरिकांच्या समस्या तक्रारी ला खो देत असल्याने आज आम सभा खुप गाजण्याचे चिन्ह होती परंतु आमसभा रद्द केल्याने तालुक्यातील ग्रामस्थात प्रचंड नाराजी पसरली आहे. हे विशेष.

महाराष्ट्र Business Katta









# ईव्हीएम छेडछाड लोकशाहीची हत्या



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**ईव्हीएम इलेक्ट्रॉनिक व टेक्निकल डिव्हाईस असल्यामुळे इव्हिएम मध्ये घोटाळा होऊ शकतो असे अनेक तंत्रज्ञ लोकांचे मत आहे. अनेकांनी ईव्हीएम मध्ये मताची हेराफेरी कशी केली जाऊ शकते याचे सर्वांसमोर प्रात्यक्षिक सुद्धा दिलेले आहे. इव्हिएमद्वारे मोजणी केलेले मतसंख्या व प्रत्यक्षात झालेल्या मतसंख्येत अनेक ठिकाणी अनेक वेळा खुप मोठी तफावत सुद्धां आढळून आलेली आहे. अनेक बुथवर बटण कोणाचेही दाबा मत मात्र कमळालाच जाते असे सुद्धां दिसुन आलेले आहे. अगोदरच्या व सध्या सुरू असलेल्या निवडणूकीमध्येही खाजगी वाहणात ईव्हीएम आढळून आल्याचे समोर आले आहे. बर हे खाजगी वाहण कमळाशीच संबधीत आहेत.**

जेथे मताची तफावत आहे तेथे कमळाचाच उमेदवार विजयी आहे. म्हणजेच काय तर ईव्हीएम मध्ये बिघाड असो, बाहेर इव्हिएमचा घोटाळा असो, वा मतमोजणी मध्ये झालेली हेराफेरी असो. हे सर्व कमळासोबतच का घडते हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ईव्हीएम खाजगी वाहणामध्ये सापडणे, मतमोजणी मध्ये तफावत असणे, कोणतेही बटण दाबले तर मत कमळाला जाणे ही साधी गोष्ट नाही. कारण वरील कृत्य लोकांचा मताधिकार शुन्य करून लोकशाहीची हत्या करणारे आहे. इलेक्ट्रॉनिक स्ट्रीम मिडिया हा जनतेचा मिडिया न राहता कमळाचा मिडिया झाल्याने या गंभीर बाबी जनतेपासून जाणीव पुर्वक लपवल्या जात आहेत. लोकशाही मध्ये सत्ता बदल करण्यासाठी सर्वात मोठे शस्त्र जर कोणते असेल ते आहे मताधिकार. परंतु याच मताधिकाराला शुन्य करून लोकशाहीची हत्या केली जात असेल तर देशात लोकशाही आहे असे म्हणणे निव्वळ अज्ञान पणाचे ठरेल. कारण ईव्हीएम च्या माध्यमातून तयार झालेल्या सरकार ला लोकांच्या मताची गरज राहली नाही. औपचारिक पणे निवडणूक घेऊन इव्हिएम मध्ये गडबड करून हवा तो उमेदवार निवडून आणला जात असेल तर लोकांच्या मताला काय किंमत? आणि लोकांच्या समस्या कशा सुटणार? लोकशाहीची हत्या करून सत्तेत बसलेले लोक लोकांच्या हिताची कामे कधीच करू शकत नाहीत. म्हणून आज शिक्षणाचा व्यापार, बेरोजगारी, महागाई, आरोग्य सुविधेचा अभाव, शेतमालाला भाव नसते, बेरोजगार लोकांना एकमेकांना विरोधात लढवून जातीय व धार्मिक तेढ निर्माण करून तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्या सारखे प्रकार जास्त वाढत आहेत. इव्हिएमच्या माध्यमातून व जनतेच्या मतामध्ये हेराफेरी करून तयार झालेल्या सरकारला वैध्य सरकार नेमके कोणत्या आधारावर म्हणता येईल. आताच पाच राज्यात विधानसभा मतदारसंघात निवडणुका झाल्या. नेहमी प्रमाणे इव्हिएम गडबडी व संशयास्पद ईव्हीएम येथेही आढळून आल्या. मध्य प्रदेश मध्ये तर ज्या स्ट्रॉंगरुम मध्ये ईव्हीएम ठेवण्यात आल्या त्या स्ट्रॉंगरुमलाच सर्वसामान्य लोकांनी पहारा देऊन इव्हिएमची सुरक्षा करत आहेत. परंतु त्यामध्येही अचानक स्ट्रॉंगरुम ला लावण्यात आलेल्या सिसिटीव्ही कॅमेऱ्याचे सिग्नल जातात आणि स्ट्रॉंगरुम मधले एका तासासाठी सर्वच दिसणे बंद होते. सर्व सिसिटीव्ही एकाच वेळी बंद होऊ शकतात तर इव्हिएम मध्ये छेडछाड का होऊ शकत नाही? जे काम निवडणूक आयोगाने करायला पाहिजे ते काम अर्थात पारदर्शक निवडणूक घेण्याचे व त्यांला संरक्षण देण्याचे तेच काम सर्व सामान्य लोकांना करावे लागत असेल तर निवडणूक आयोग नेमके कोणते काम करतो हा प्रश्न उपस्थित राहणे साहजिकच आहे. निवडणूक आयोगाच्या कस्टडीत असलेल्या ईव्हीएम कमळाच्या गाडीत कशा सापडतात? कमळावाले आणि निवडणूक आयोग एकच आहेत का हा प्रश्न सर्वसामान्य जनतेच्या मनात घर करून बसला आहे. निवडणूक आयोगाकडच्या ईव्हीएम कमळाकडे, बटण दाबले तरी मत कमळाकडे, मतमोजणी तफावत मत कमळाकडे हा जाहीर घोटाळा निवडणूक आयोगाच्या लक्षात येत नाही का? सर्व सामान्य लोक व अनेक राजकीय पक्ष यांनी इव्हिएम बंद करून बॅंलेट पेपरवर निवडणूक घेण्याची मागणी केली असताना लोकांचा ईव्हीएम वर विश्वास नसताना निवडणूक आयोग ईव्हिएमवरच निवडणूक घेऊन लोकशाही ची हत्या कोणाच्या सांगण्यावरून करत आहे नव्याने सांगण्याची गरज नाही. थोडक्यात लोकशाहीला बाजूला सारून निवडणूक आयोग व कमळ एकत्र येऊन काम करताना कमळाचा मिडिया एकही शब्द बोलत नाही यावरून कमळाप्रती किती एकनिष्ठ आहे याची जाणीव होते. एका ठिकाणी बॅंलेट पेपरची पेटी रात्री उघडल्याचे समोर आले आहे. मतमोजणी अगोदरच बॅंलेट पेटी उघडून मताची हेराफेरी करून बहुतेक कमळावाले अंधाऱ्या रात्रीत लोकशाही मजबूत करण्याचा प्रयत्न करत असतील. लोकशाहीची हत्या होताना, लोकांच्या मताची किंमत शुन्य होताना स्ट्रीम मिडिया तर काही बोलत नाही परंतु स्वतः ला राष्ट्रप्रेमी समजणारे, स्वतः ला विद्वान व गुणवंत समजणारे लोकही जर इव्हिएमच्या विरोधात बोलणार नाही आणि पारदर्शक निवडणुकीची मागणी लाऊन धरणार



नाहीत तर येण्याऱ्या पिढी आर्थिक, शारीरिक व मानसिक गुलाम झाल्याशिवाय राहणार नाही. जनतेचा हजारो करोडो रुपये खर्च करून इव्हिएम ला व्हिव्हिपॅंट बसवले आहे. कारण सुरवाती पासून लोकांचा विश्वास इव्हिएमवर बसत नव्हता. म्हणून व्हिव्हिपॅंट बसवले. व्हिव्हिपॅंट द्वारे आपण दिलेले मत आपल्याच उमेदवाराला गेले का याची खात्री करता येते. मग जर मतदार हा व्हिव्हिपॅंट मधील स्लिप ला बघुन आपल्या मताची खात्री करून घेऊ शकतो तर ज्या आधारावर खात्री केली जाते ते व्हिव्हिपॅंट स्लिप ची मोजणी का होत नाही? हा सर्वात मोठा प्रश्न आहे. इव्हिएम पारदर्शक आहे, कमळाचा त्यामध्ये काहीच हस्तक्षेप नाही तर व्हिव्हिपॅंट मधील स्लिपची मोजणी झाली तर बॅंलेट पेपर ही लावण्याची गरज नाही. परंतु इव्हिएम, इव्हिएमच्या माध्यमातून होणारी मताची हेराफेरी या विरोधात बहुतांश नागरिक व विरोधी पक्ष कधी कधी बोलताना दिसतात. परंतु कमळावाले मात्र कधीच इव्हिएमच्या विरोधात बोलत नाहीत. बर इव्हिएम मध्ये गडबड होऊ शकते म्हणून सर्वात अगोदर इव्हिएमला कायदेशीर विरोध करणारे कमळावालेच होते. परंतु कमळाच्या हाती सत्ता आल्याने इव्हिएम पण शुद्ध झाली असेच दिसते. जसे कमळाकडे भ्रष्टाचारी आमदार खासदार गेले की ते प्रामाणिक होतात तीच गत इव्हिएमची झाली आहे. कमळावाल्यांना आपल्या कामावर विश्वास असेल, आणि जनतेच्या मताची किंमत असेल तर एकदा तरी त्यांनी बोलाव लोक म्हणतील तशी निवडणूक घ्या. आम्ही आमच्या कामावर निवडून येऊ. परंतु एवढे धाडस कमळावाले करतील ही अपेक्षा च जनतेने सोडून दिली आहे. कमळावाले इव्हिएम ला एवढा जिव लावत आहेत की जसे इव्हिएम त्यांच्या पक्षातील एक महत्त्वाचा घटक आहे. लोकमत कमळाच्या विरोधात दिसत असताना कमळाचे अस्तित्व केवळ ईव्हिएम वर अवलंबून आहे. इव्हिएम बंद केली किंवा व्हिव्हिपॅंट च्या स्लिपची जरी मोजणी तर कमळ व्हेंटिलेटरवर असेल असा लोकांचा समज आहे. परंतु कमळाला वाचवण्यासाठी इव्हिएमच्या माध्यमातून लोकशाही ची हत्या होत असताना आपण आपल्या डोळ्यांनी पाहत असु आणि लोकशाही ची हत्या होण्याचे दुःख होत नसेल, चिड येत नसेल तर एक गोष्ट नक्की आपण तर गुलाम झाले आहोत. येणारी पिढीही गुलामच होईल. प्रत्येक निवडणुकीत इव्हिएमचा गैरवापर दिसून येतो, लोकांचा विश्वास इव्हिएमवर नाही, इव्हिएम जनतेचे मत नष्ट करून भलतेच कोणाला मत देत असेल तर हि खुप गंभीर गोष्ट तर आहेच परंतु लोकशाहीची हत्या ही आहे. लोकशाही वाचवण्यासाठी व गुलामी नष्ट करण्यासाठी इव्हिएम बंद करून बॅंलेटपेपरवर निवडणूक घेऊन लोकांना त्यांच्या मताधिकाराचा योग्य वापर करून स्वतः चे भविष्य व देशाचा विकास स्वतः घडवता आला पाहिजे. म्हणून लोकशाही ला वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र ईव्हिएम ला विरोध करून पेपरवर निवडणूक होणे आवश्यक आहे.

# भारताने पर्यटन वाढीसाठी प्रयत्न करायला हवेत



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**श्रीलंका, थायलंड आणि मलेशियाने पर्यटन उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी भारतीयांसाठी व्हिसाची अट माफ केली आहे. व्हिएतनाम देखील असेच धोरण राबवण्याच्या विचारात असल्याच्या असल्याच्या बातम्या येत आहेत. थायलंड आपल्या ईस्टर्न इकॉनॉमिक कॉरिडॉरमध्ये भारतीय नागरिकांसाठी 10 वर्षांच्या कालावधीसह गुंतवणूकदार व्हिसा लागू करू शकतो. या देशांच्या निर्णयांवरून असे दिसते की ते भारतीय पर्यटकांना अधिक महत्त्व देत आहेत. कोविड महामारीनंतर भारतीय पर्यटक या देशांच्या पर्यटन क्षेत्राला आर्थिक पुनरुत्थानासाठी मदत करत आहेत.**


प्रवास व्हिसा मोफत केल्याने अनेक प्रकारचे त्रास दूर होतील आणि परिणामी पर्यटकांचा ओघ वाढेल. चीनमधून येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत घट झाल्यानंतर दक्षिण-पूर्व आशियाई देशांनी भारतीय पर्यटकांना आकर्षित करण्यावर अधिक भर देण्यास सुरुवात केली आहे.

श्रीलंका सरकारने या संदर्भात उचललेली पावले अधिक गरजेची आहेत. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या अर्थव्यवस्थेला तिथल्या सरकारला संजीवनी द्यायची आहे. ऑस्ट्रेलिया आणि रशियानेही व्हिसाशी संबंधित प्रक्रिया सुलभ केली आहे. या देशांनी अधिकाधिक पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ई-व्हिसा सुरू केला आहे.

भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे आणि परदेशात जाण्याची भारतीयांची इच्छाही वाढत आहे. भारतातून मोठ्या संख्येने लोक पर्यटन, प्रवास किंवा इतर कामासाठी परदेशात जात आहेत. एका आंतरराष्ट्रीय सल्लागार संस्थेने अंदाज व्यक्त केला आहे की 2030 सालापर्यंत भारत परदेश प्रवासावर खर्च करणारा चौथा सर्वात मोठा देश बनलेला असेल. अर्थात भारतातील लोकांमध्ये परदेशात जाण्याचा प्रचंड उत्साह असण्याची अनेक कारणे असू शकतात.

कोविड महामारीनंतर जागतिक स्तरावर सर्व काही सुरळीत सुरू झाल्यावर लोक परदेशात प्रवास करण्याच्या त्यांच्या इच्छेचा फायदा घेत आहेत. हे सर्वात महत्त्वाचे कारण मानले जाऊ शकते. भारतातील लोकसंख्येचे स्वरूप हे देखील एक मोठे कारण आहे. तरुणांमध्ये परदेशात जाण्याची इच्छा वाढत आहे.

एका अध्ययनानंतर भारतीय ग्राहक बाजारपेठेचा वाढता आकार सूचित करतो की प्रवास आणि मनोरंजनावर अधिक खर्च करू शकणाऱ्या भारतीय कुटुंबांची संख्या वाढली आहे. वर्ष 2019 मध्ये, प्रवास आणि पर्यटनावर अंदाजे 150 दशलक्ष डॉलर खर्च केले गेले आणि 2030 पर्यंत ते 410 अब्ज डॉलरपर्यंत वाढू शकेल असा अंदाज आहे. 2022-23 मध्ये भारतीय वैयक्तिक प्रवासावर 21 अब्ज डॉलर खर्च करतील, अशी अपेक्षा आहे. हा आकडा 2021-22 च्या तुलनेत 90 टक्क्यांनी अधिक आहे. एयू शेन्जेन आणि यूएस व्हिसासाठी दीर्घ प्रतीक्षा कालावधीमुळे, दक्षिण-पूर्व आशियाई देश भारतीयांसाठी आकर्षक पर्यटन स्थळे बनत आहेत.



दरम्यान, भारत सरकार स्थानिक पातळीवर पर्यटन क्षमता वाढवण्यावर भर देत आहे, हे स्वागतार्ह पाऊल आहे. 2023-24 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात पर्यटनासाठी 2,400 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही रक्कम 18.24 टक्क्यांनी अधिक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमाच्या ताज्या भागात



देशातील नागरिकांना परदेशात विवाह सोहळ्याचे आयोजन टाळण्याचे आवाहन केले आहे. सरकारने अलीकडेच लग्न समारंभ आयोजित करण्यासाठी भारताला एक उच्चभ्रू ठिकाण म्हणून दाखवणारी मोहीम सुरू केली आहे.

पर्यटन उद्योगाला भरपूर श्रम लागतात, त्यामुळे त्यामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करण्याची प्रचंड क्षमता आहे. या दृष्टीकोनातून परदेशात जाण्याकडे भारतीयांचा वाढता कल लक्षात घेता याचा फटका स्थानिक पातळीवरील पर्यटनाला बसू शकतो. भारतातील पर्यटन क्षेत्र विकसित करण्यासाठी सरकारच्या सर्व स्तरांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. देशातील पर्यटन केंद्रे विकसित करण्यासाठी केंद्र सरकार, राज्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना एकत्र काम करावे लागेल. त्यासाठी सरकारला पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करावी लागेल आणि देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सुविधांचा विकास करावा लागेल.

परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व्हिसा धोरणाचे उदारीकरण केल्यास नजीकच्या काळात त्यांचा ओघ वाढेल. पण हे करताना भारतालाही सावध राहण्याची गरज आहे. कमी कालावधीत मोठ्या प्रमाणात व्हिसा जारी करण्यासाठी ठोस प्रशासकीय संरचना तयार करावी लागेल. परदेशी नागरिकांचा व्हिसाची मुदत संपल्यानंतर त्यांची तस्करी, अनियमित स्थलांतर आणि व्हिसा-सवलत असलेल्या देशांकडून आश्रय अर्ज यासारख्या समस्यांनाही भारताला सामोरे जावे लागेल.



# संस्थेत पुरुषांप्रमाणेच आता स्त्रियांचाही समावेश!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**आपल्या भारत देशाच्या सीमांची सुरक्षितता आणि त्याच्याशी निगडित असलेले विषय ही सीमा सुरक्षा दलाची प्राथमिक भूमिका होय. सीमा सुरक्षा दलाचे काम शांतताकाळ आणि युद्घकाळ या दोन्हींत सातत्याने चालू असणे आवश्यक असते. सीमा सुरक्षा दल- बॉर्डर सिक्युअरिटी फोर्स म्हणजेच सीमेपलीकडून होणाऱ्या गुन्ह्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवून सीमेचे शांतता काळात संरक्षण करण्यासाठी नेमलेले सैन्यदल होय. देशाच्या आंतरराष्ट्रीय सीमांचे संरक्षण हे सैन्यदलाचे प्राथमिक कर्तव्य असले, तरी सदासर्वकाळ- विशेषतः शांतता काळातही- सैन्य तैनात करणे, हे एकूण सैन्याच्या युद्घक्षमतेला हानीकारक आहे.**



काही अशांत व जागृत सीमांवर सैन्यदलांच्या तुकड्यांची उपस्थिती अपरिहार्य असली, तरी बाकीच्या सीमांवर सैनिकीसम दलाची- पॅरामिलिटरी फोर्स योजना करणे, हे सीमा सुरक्षिततेच्या दृष्टीने इष्ट ठरते. या सैनिकीसम दलाचे किंवा पोलीस दलाचे प्रमुख काम हे सीमोल्लंघन आणि तस्करीविरोधी स्वरूपाचे असते. किंबहुना हे काम सैन्यदलांच्या कक्षेबाहेरील आहे. यासाठी इ.स.१९४७ ते १९६५ दरम्यान भारताच्या धोकाविरहित सीमापट्ट्यांवर संबंधित राज्यांच्या जबाबदारीखाली राज्य सशस्त्र पोलिसांच्या- स्टेट आर्म्ड पोलीस तुकड्या तैनात केल्या जात असत. जम्मू व काश्मीरमधील काही भाग वगळता बाकी पूर्ण सीमापट्टा या पोलीस दलाच्या अधिक्षेत्राखाली होता. पाकिस्तानने कच्छ विभागातील सरदार पोस्ट, छाड बेट आणि बेरिया बेट या गुजरात राज्यातील सशस्त्र पोलिसांच्या चौक्यांवर दि.९ एप्रिल १९६५ रोजी अचानक हल्ले चढवले गेले. त्यानंतर मात्र हे सर्व बदलावे लागले. राज्य सशस्त्र पोलीस दल शत्रूच्या सैन्याकडून होणाऱ्या पद्घतशीर हल्ल्याचा प्रतिकार करण्यास असमर्थ असल्याचे स्पष्ट झाले. त्यासाठी लागणारे युद्घसाहित्य, प्रशिक्षण आणि सैनिकी सामर्थ्य स्वाभाविकच सशस्त्र पोलिसांकडे नव्हते. त्यामुळे शत्रूच्या हल्ल्यानंतर माघार घेण्याशिवाय त्यांच्यापुढे अन्य कोणताच पर्याय उरला नव्हता.

शांतताकाळ किंवा युद्धकाळ या बाबतीत सर्व दृष्टींनी विचारविमर्ष झाल्यावर पाकिस्तानला लागून असलेल्या सीमांवर एका विशेष, केंद्रनियंत्रित आणि शत्रूच्या हल्ल्याचा समर्थपणे प्रतिकार करू शकणाऱ्या पोलीस दलाची आवश्यकता असल्याची खात्री केंद्र शासनाला पटली. तेव्हा सीमा सुरक्षा दल या विशेष पोलीस दलाची रचना करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार आजच्या दिवशी दि.१ डिसेंबर १९६५ रोजी भारतीय सीमा सुरक्षा दलाची स्थापना झाली. भारतीय पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी के.एफ्.रुस्तमजी यांची पहिले दलप्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत या दलाचे कार्य चालते. या दोन वेगवेगळ्या परिस्थितीत त्यांच्या कामांची जंत्री अशी- १) शांतता काळातः सीमा प्रदेशात राहणाऱ्या जनतेत सुरक्षिततेच्या भावनेची जोपासना करणे सीमापार गुन्हे आणि अवैध प्रवेश-निर्गमनावर प्रतिबंध लादणे आणि चोरीची आयात-निर्यात आणि इतर अवैध कारवायांवर नियंत्रण ठेवणे. २) युद्घकाळातः दुय्यम धोक्याच्या क्षेत्रांमध्ये शत्रूच्या हल्ल्याविरुद्घ संरक्षणफळी उभी करून महत्त्वाच्या ठिकाणांचे संरक्षण करणे. तसेच विस्थापितांचे नियंत्रण-पुनर्वसन करून निर्देशित क्षेत्रात घुसखोरीविरुद्घ कारवाई करणे.



सीमा सुरक्षा दलाच्या कार्यक्षेत्रास वेगवेगळे नवे पैलू प्राप्त झाले आहेत. या दलाच्या तुकड्या संयुक्त राष्ट्रांमार्फत शांतता प्रस्थापनेसाठी कोसोव्हो आणि बोस्नियामध्ये पाठवल्या गेल्या. केवळ पाकिस्तान सीमेपर्यंतच मर्यादित न राहता सीमा सुरक्षा दलाच्या तुकड्या उपद्रववादी विरोधी कार्यवाहीसाठी मणिपूर राज्यातही तैनात आहेत. गुजरातमधील जानेवारी २००१ मधील भूकंप आणि इतर जातीय दंगलींदरम्यान सीमा सुरक्षा दलाने लक्षणीय कामगिरी बजावली आहे. या दलाच्या उपलब्धींचा धावता आढावा घ्यायचा म्हटल्यास इ.स.१९९० ते २००८ या एकोणीस वर्षांच्या कार्यकाळात दलाने ४,८११ दहशतवादी ठार केले, ११,७८७ घुसखोर पकडले, १५,७५६ शस्त्रे जप्त केली, १,९२३ कोटी रुपये मूल्यांची चोरटी आयात-निर्यात पकडली आणि १३,६५४ किग्रॅ स्फोटके जप्त केली. या कालखंडात सुरक्षा दलांच्या १,३७३ जवानांनी प्राणाहुती दिली, तर ५,६६५ जवान जखमीही झाले. ही आकडेवारी सीमा सुरक्षा दलाच्या सर्वोच्च राष्ट्रसेवेची द्योतक होय. एवढे असूनही सीमा सुरक्षा दलालाच नेहमी का लक्ष्य केले जाते? हे जाणून घेण्यापूर्वी बीएसएफ बाबतच्या या नऊ महत्त्वाच्या गोष्टी जाणून घ्यायला हव्यात- १) बीएसएफची स्थापना इ.स.१६६५ साली करण्यात आली होती. तत्कालीन लष्कराच्या मनुष्यबळ आणि साधन सामुग्रीच्या मर्यादा लक्षात घेता हे निमलष्करी दल स्थापण्यात आले. २) बीएसएफचे संस्थापक के.एफ.रुस्तमजी यांनी सन १९७१च्या बांगलादेश युद्धात महत्त्वाची भूमिका बजावली होती. ३) बीएसएफच्या स्थापनेतील योगदान लक्षात घेता तटरक्षक दलाच्या स्थापनेसाठी त्यांना पाचारण करण्यात आले होते. ४) १८६ बटालियन आणि २.४ लाख जवान असणाऱ्या या दलाला इण्डियाज फर्स्ट वॉल ऑफ डिफेन्स म्हणजे भारताची पहिली संरक्षक भिंत, असे म्हटले जाते. ५) "जीवन पर्यंत कर्तव्य" हे बीएसएफचे घोषवाक्य आहे. दुर्गम भागात जाण्यासाठी बीएसएफकडे उंट आणि श्वानपथकाची वेगळी फौज आहे.६) सन २००१च्या भूज भूकंपात पीडितांना मदत करण्यासाठी सर्वप्रथम बीएसएफचे जवान पोहोचले होते. ७) दंगली आटोक्यात आणण्यासाठी ज्या अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर होतो, तो अश्रुधूर निर्माण करणारे टिअर स्मोक युनिट हे बीएसएफतर्फे चालवले जाते. ८) पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या संस्थेत आता स्त्रियांचासुद्धा समावेश करण्यात आला आहे. ९) बीएसएफच्या काही अधिकाऱ्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता मोहिमांवर पाठवले जाते. सीमा सुरक्षा दलाच्या स्थापनेपासून आजतागायत हे दल राष्ट्रसेवेसाठी झटत आहे. भारत-पाक यांच्यामधील सन १९७१चे बांगला देश युद्घ आणि सन १९९९चे कारगिल युद्घ या दोन्हींमधील त्यांची कामगिरी कौतुकास्पद आहे. दिवस-रात्र डोळ्यात तेल घालून सीमासंरक्षण करणाऱ्या या दलाचे कार्य सुकर आणि परिणामकारक होण्यासाठी भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमा आणि जम्मू व काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर अभेद्य लोखंडी कुंपण बांधून रात्री दोन्ही बाजूंचे क्षेत्र स्पष्ट दिसण्यासाठी त्यावर रोषणाई करण्यात आली आहे. त्यामुळे घुसखोरांचे प्रमाण कमी होऊन सीमा सुरक्षा दलाच्या जवानांच्या कामास मदत मिळाली आहे. सीमा सुरक्षा दलाला १ महावीरचक्र, ४ कीर्तिचक्रे, ११ वीरचक्रे, १० शौर्यचक्रे आणि ५६ सेनापदके या वीरसन्मानांनी गौरविण्यात आले आहे. त्याशिवाय अनेक सन्मान त्याच्या अधिकारी आणि जवानांना व्यक्तिगत पातळीवर प्राप्त झाले आहेत. राष्ट्रसेवेसाठी वाहून घेतलेल्या सीमा सुरक्षा दलाचे हे धवल राष्ट्रकार्य भविष्यातही चालू राहील यात तीळमात्रही संदेह नाही!

# एका कोंबड्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य




गुलाब बिसेन
संपर्क क्र. 9404235191

आधुनिक केसरी

**प्रयोगशील गटशिक्षणाधिकारी म्हणून सुपरीचीत असलेले संवदेनशील लेखक नामदेव माळी "एका कोंबड्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य" ही नवीन रंजक तितकीच उद्बोधक बालकादंबरी घेऊन आले आहेत. लेखक नामदेव माळी यांनी गटशिक्षणाधिकारी असताना मिरज तालुक्यामध्ये सातत्याने मुलांचे साहित्य संमेलने भरवलेली आहेत. सोबतच सृजन प्रकाशनाच्या माध्यमातून लहान मुलांना लिहिते करत त्यांच्या कथा कवितांची पुस्तके प्रकाशित केली आहेत. वाचन चळवळीत ते सातत्याने योगदान देत आहेत.**

या कादंबरीचा नायक हा एक कोंबडा आहे. ग्रामीण जिवनात कोंबड्याला अनन्यसाधारण महत्व आहे. पहाटे जागे करायला कोंबड्याची बांग घरोघरी आजही ऐकू येते. त्याचे पहाटेचे आरवणे ग्रामीण संस्कृतीचा भागच झाला आहे. अशा गब्रू कोंबड्याच्या आरवण्यावरच शेजाऱ्यांकडून आक्षेप घेतला जातो. त्यामुळे त्याच्या आयुष्यात जे वादळ येते. ते वादळ शमवण्यासाठी त्याची मालकीन असलेली आजी आणि तिचा नातू गौरव यांच्या प्रयत्नांची ही कहानी लेखक नामदेव माळी यांनी अत्यंत रंजकपणे शब्दबद्ध केली आहे. गावात एकटीच राहणाऱ्या गौरवच्या आजीला त्याचे आईबाबा शहरात घेऊन येतात. सोबत आजीच्या कोंबड्याही तिच्या सोबत आणतात. त्यात असतो रुबाबदार गब्रू कोंबडा. तो सवयीप्रमाणे पहाटे आरवायला लागतो. त्याच्या रोजच्या आरवण्याचा त्रास शेजारच्या म्हाताऱ्या आजी - आजोबांना होतो. येथूनच या कादंबरीच्या प्रवासाला सुरुवात होते. या कादंबरीची मांडणी ही कादंबरीच्या नावाप्रमाणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या सभोवती फिरणारी असली तरी कादंबरीची भाषा ही अत्यंत साधी सरळ बालसुलभ अशी आहे. गरजेनुसार काही संवादांमध्ये लेखकाने बोलीभाषेचा परीणामकारकपणे वापर केला आहे. त्यामुळे कादंबरी वाचताना वाचकाला ती आपलेसे करते. कादंबरीचा नायक गब्रू कोंबडा असला तरी कादंबरीचे कथानक गौरवच्या माध्यमातून पुढे सरकत जाते. गब्रूवरील अन्याय दूर करण्यासाठी गौरव हा मुद्दा सृजन वाचनकट्ट्यावरील मित्रमंडळी आणि मोठ्यांना सांगतो. यातून गब्रूच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विषय हा गौरवच्या घरापूरता मर्यादित न राहता तो ग्लोबल रूप घेतो. पत्रकारांच्या माध्यमातून प्रसार माध्यमांतून बातम्या झळकतात. गब्रू बचावची मोहिमही सुरू होते. हा कादंबरीचा प्रवास वाचताना वाचकाला कुठेही कंटाळा येणार नाही याची काळजी लेखक नामदेव माळी यांनी पुरेपुर घेतलेली आहे. मुलांची जिज्ञासा जागृत करणाऱ्या कादंबरीच्या मांडणीमुळे वाचताना वाचकाला पुढे काय घडेल याची उत्सुकता लागलेली असते.

जगाला स्वातंत्र्य, समता आणि बंधूतेची शिकवण देणाऱ्या फ्रांस देशातही कोंबड्याच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा प्रयत्न झाला होता. त्यावेळी "मॉरीस" नावाच्या कोंबड्याच्या मालकीन 'कारिमी फेसऊ' यांनी दिलेला लढ्याची सृजन




कट्यावर श्रावणीने सांगितलेल्या गोष्टीची कादंबरीतील गुंफण अत्यंत समर्पक झालेली आहे. बालमनाची उत्कंठा वाढवण्यासोबत ज्ञानात भर घालणारी आहे. सत्य घटनेचा कादंबरीत लेखकाने केलेला अंतर्भाव हा उत्तम परीणाम साधणारा आहे.

सृजन कट्ट्यावरील मुलांनी सांगलीत "गब्रू बचाव" ची छेडलेली मोहीम, तक्रारदार आजी आजोबांचे पोलिसात जाणे. पोलिसांनी दाद न दिल्याने जिल्हा परीषदेत जाणे हा कादंबरीचा सारा प्रवास अद्भुत असाच आहे. हा सगळा गोंधळ सुरू असताना एक दिवस अचानक विचित्रच घटना घडते. गब्रू गौरवला जंगलात फिरायला घेवून जातो. तिथे गौरवला अंगातून काहीतरी सळसळल्याचा भास हातो. अचानक उड्या माराव्याशा वाटू लागतात. त्याच्या शरीरातून हजारो सुया गुदगुल्या करत बाहेर येतात. झाडाला पालवी फुटत जावी तशी गौरवला पिसं फुटतात. त्यापुढेही अनेक आश्चर्यजनक घटना घडतात. कादंबरीचा हा सारा प्रवास बालमनाची उत्कंठा वाढवणारातर आहेच. परंतु कल्पनेच्या अद्भुत जगाची मनोरंजक सफर घडवणाराही आहे.

गब्रूच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा निर्माण झालेला प्रश्न शेवटी जिल्हाधिकाऱ्यांकडे जातो. लोकशाही दिनी त्यावर सुनावणी होते. या सुनावणीत काय घडते? आजी आणि गौरव आपली बाजू कशी मांडतात? जिल्हाधिकारी कुणाच्या बाजूने निकाल देतात? वृद्ध आजी - आजोबांनी गब्रूच्या आरवण्याची तक्रार का केली? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे वाचकाला अंतर्मूख व्हायला भाग पाडतात. कादंबरीत लेखकाने मांडलेला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विषय बालकांपर्यंत सहज सोप्या आणि रंजक पद्धतीने पोहचवण्याचा केलेला प्रयत्न अत्यंत प्रशंसनीय आहे. देशाच्या भावी नागरीकांमध्ये एका पक्ष्याच्या आयुष्यात उद्भवलेल्या समस्येच्या माध्यमातून अभिव्यक्ती स्वातंत्र्यासारखा महत्वाचा विषय रंजक कादंबरीच्या माध्यमातून बालमनापर्यंत पोहचवण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. नेहमीपेक्षा वेगळ्या विषयाच्या आणि वेगळ्या धाटणीच्या या बालकादंबरीला वाचक आपलेसे करतील हे नक्की!

**पुस्तकाचे नाव – एका कोंबड्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य**
**प्रकाशक – साधना प्रकाशन, पुणे**
**लेखक – नामदेव माळी**
**किंमत – १२५ रू.**

# तंत्रज्ञान असावे मात्र त्याचा गैरवापर नको...

आधुनिक केसरी

आपल्या देशाने विविध तंत्रज्ञानामध्ये साधलेली प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे त्यामुळे माणूस चंद्रावर जाण्याचे स्वप्न आगामी काळात पुर्ण करेल अशी शाश्वती वाटतं आहे तरीपण विघ्नसंतोषी लोक या तंत्रज्ञानाचा गैरवापर करत असल्याचे समोर आले आहे त्यामुळे याचा संपूर्ण देशवासीयांना फटका बसल्याशिवाय राहणार नाही सद्या सगळीकडे डीपफेक तंत्रज्ञानाबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे डीपफेक म्हणजे बनावट घटनांच्या प्रतिमा, ऑडिओ,बनावट सामग्री तयार करणे असा होत असला तरी आज कोणीही उठतो आणि एखाद्याला डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून बदनाम करतो यातून राजकीय बडे नेते सुद्धा सुटलेले नाहीत हि विचार करायला लावणारी बाब आहे या तंत्रज्ञानाचे अनेकजण बळी पडले आहेत हे डीपफेक तंत्रज्ञान एखाद्या व्यक्तीची प्रतिमा मलिन करण्यासाठी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे तंत्रज्ञानामुळे जग जरी जवळ आले असले तरी याचा गैरवापर होत असल्याने सगळ्यांचीच चिंता वाढली आहे त्यासाठी भारत सरकारने तंत्रज्ञान वापरण्यासाठी कडक नियमावली लागू करणे कधीही हिताचे ठरणारे आहे !

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव



# 'चांदणे शब्दफुलांचे'

आधुनिक केसरी


**कोजागिरीच्या मनोरम चांदण्या रात्री अर्थात २८ ऑक्टोबर २०२३ ला चाळीसगावचे जेष्ठ आणि प्रथितयश साहित्यिक श्री विश्वास देशपांडे यांचे 'चांदणे शब्दफुलांचे' हे नवे पुस्तक प्रकाशित झाले. पुस्तक वाचल्यावर लक्षात आले की यातील काही लेख समाजमाध्यमांवर आलेले होते. मात्र एक सलग पुस्तक वाचतांना तेच लेख नवे रूप लेऊन आल्याचे जाणवले. जणू चांदण्या रात्रीच्या गोड स्वप्नाची अनुपम अशी अनुभूती जागृतावस्थेत परत अनुभवली. पुस्तकाचे शीर्षक उत्कंठावर्धक आणि देखणे आहेच आणि त्याला साजेशी गर्द निळाईच्या पार्श्वभूमीवर फुललेली कुमुदिनी मुखपृष्ठावर अतिशय आकर्षक दिसते.**

विश्वास सरांच्या ललित लेखांचा सुरेख कोलाज या आधीच्या पुस्तकांत अनुभवलेला आहे. मात्र या पुस्तकात कोलाज आहे तो विभिन्न व्यक्तिरेखांचा! याला कोलाज म्हणणेच योग्य, कारण प्रत्येक व्यक्तिरेखेची रूपरेषा, मांडणी आणि सजावट वेगवेगळी आहे! मग या सर्वांना जोडणारा एक धागा कोणता तर यातील सर्व मानवी व्यक्तिचित्रे काही सांगतात, बोलतात आणि आपल्याला विचार करायला प्रवृत्त करतात. कांहींचे व्यवसाय उच्चभ्रू तर कांही रोजच्या जीवनातले आपले भागीदार, कांही प्रसिद्धीच्या उंचच उंच शिखरावर विराजित तर कांहींच्या रोजच्या जीवनात अन्न, वस्त्र अन निवारा शोधण्याची धडपड सुरु! असे या पुस्तकातील विविधरंगी अन विविधगंधी व्यक्तिरेषांच्या आडव्या उभ्या धाग्यांनी विणलेले कोलाज वेगळेच सौंदर्य दर्शवते.

शीर्षकाच्या नावाच्याच 'चांदणे शब्दफुलांचे' या पहिल्या लेखातच वाचकांचे मन एका सुवर्णयुगात पोचते. बालगंधर्व आणि पु ल यांच्यावरचा हा लेख म्हणजे अखिल महाराष्ट्राच्या हृदयसिंहासनावर ज्यांच्या गौरवान्वित अन वलयांकित प्रतिमा कायम कोरल्या गेल्या आहेत, त्या दैदिप्यमान सूर्य चंद्र यांची जणू 'ज्योतीने तेजाची केलेली आरती'! नारायणराव आणि पुरुषोत्तम या दोन नावातील साम्य साधत लिहिलेला हा अप्रतिम लेख म्हणजे गरम जलेबी अन थंडगार रबडीचे पौष्टिक अन रुचकर कॉम्बो! आता रंगमंचाचा पडदा उघडल्यावर जसे एकाहून एक सरस नटसम्राट रंगमंचावर अवतरतात, तद्वतच हे लेख कागदावर अवतरल्यावर जणू त्या रंगमंचाच्या लखलखीत प्रकाशाला चार चांद लागत आहेत असे वाटते. लावण्याचा गाभा असलेले देखणे महान संतूरवादक दिवंगत पंडित शिवकुमार शर्मा यांच्यावरील लेख विश्वास सरांच्या संगीताविषयी असलेल्या गहन जाणीवा आणि ज्ञानाची साक्ष देतात. तसेच ते दिवंगत झाल्यावर हा लेख लिहिलेला असल्याने पुरुषी सौंदर्याची मूर्तिमंत प्रतिभा अन प्रतिमा आणि संतूरला आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त करून देणाऱ्या या दिग्गज वादकाचे मूर्तिमंत चित्र डोळ्यासमोर उभे राहिले! याच संगीतदालनात ज्यांच्या स्वरात आणि संगीतात ईश्वरी साक्षात्कार होतो, असे संगीतकार गायक हेमंतकुमार यांच्यावरील लेख खूपच वाचनीय असा आहे.

हा झाला एक रंग! मात्र सरांचा आवडीचा अन अभ्यासपूर्ण वाचन, लेखन, भाषण आणि चिंतनातून साकार झालेला भक्तिरंग त्यांना अन त्यांच्यासंगे आपल्यालाही सावळ्या रंगाची बाधा प्रदान करतो. विठू माउली, भगवान परशुराम, ज्ञानेश्वर माउली, गोंदवलेकर महाराज, गणेश उत्सव इत्यादी विविध लेखांतून झिरपत गेलेली दिव्य प्रकाशशलाका थेट आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यात चैतन्याचे तेजस्वी दीप उजळून टाकते. यासोबतच भेट झालेली नसतांना देखील भेटीची आस धरून बाबासाहेब पुरंदरे यांना श्रद्धांजली समर्पित करीत लिहिलेला लेख असाच हृदयंगम आहे. बाबासाहेबांचे विस्तीर्ण जीवन पटल आपल्यासमोर उलगडण्यात लेखकाची कल्पनाशक्ती, शब्दवैभव अन भावनांचे कल्लोळ यांचा सुरेख मिलाप दिसून येतो. विविध क्षेत्रातील व्यक्तिमत्वे वेचताना लेखकाच्या सामाजिक जाणीवा अत्यंत प्रखर आणि दूरदर्शी आहेत हेच दिसून येते. वनस्पती शास्त्रज्ञ ल्युथर बरबँक, पोलिओची लस शोधून मानवाला निरामय अक्षत जीवन प्रदान करणारा डॉक्टर जोनास साक, कीटकनाशकांचे दुष्परिणाम शोधत नामधारी अन माजलेल्या मल्टिनॅशनल कंपन्यांशी दोन हात करणारा डॉक्टर टायरॉन हेज, सिंगापूरला नाव, रूप अन वैभव प्रदान करणारा ली क्कान यु, क्रांतिसूर्य हेमंत सोमण, सेरेब्रल पाल्सीग्रस्त, पण जिच्या आकांक्षांचा वेलू गगनाला भिडला आहे अशी स्फूर्तीदायिनी आणि चैतन्यमयी वल्लरी करमरकर आणि इतरही व्यक्ती या ललित लेखांच्या मांदियाळीत आपल्याला भेटतील.

सामाजिक व्यक्तिरेखांसह या पुस्तकात सुखनैव नांदणाऱ्या विश्वास सरांच्या नात्यातील अन आसपास वावरणाऱ्या व्यक्तींना देखील आपण जणू प्रत्यक्ष भेटतोय असा भास होतो. शीर्षस्थानी अर्थातच लेखकाच्या तीर्थरूप 'आई' आहेत. आई अन मुलाचे भावनिक प्रेममय नाते उलगडणारा हा लेख देवघरातील शांतपणे तेवणाऱ्या पावन नंदादीपाची स्मृती जागवून भावविभोर करून जातो. या पुस्तकात लेखकाने चित्रविचित्र व्यवसायातील मंडळी एकाच पंगतीत आरामात ऐसपैस बसवली आहेत. मिस्त्री, गवंडी, नाभिक अन कल्हईवाला यांच्या सोबत ज्ञानवंत गुरुमूर्ती सर, उच्च विद्याविभूषित डॉक्टर गोपाळ देशपांडे अन त्यांच्या स्वयंप्रकाशित सौ. विभा हे देखील या पंगतीत आहेत. लेखांची नावे अनवट आणि उत्सुकता ताणणारी पण मॅटरमध्ये अन मीटर मध्ये चपखल बसणारी (दोन उदाहरणे देते- वल्लरीवरच्या लेखाचे नाव 'फिटे अंधाराचे जाळे' तर नाभिकांवरील लेखाचे शीर्षक-'सर जो तेरा चकराये'). लेखकाचे गीत-संगीताचे उपजत अन अद्ययावत ज्ञान असे संपूर्ण पुस्तकातून प्रतिबिंबित होत राहते.




मंडळी, या पुस्तकाच्या व्यक्तिविशेषांकात एकंदरीत ३६ लेख आहेत. अशा रचनेची एक खासियत असते. मैफिलीत जसे प्रत्येक गायक एक स्वतंत्र गाणे म्हणतो, आपण ते गाणे संपल्यावर नवीन गायकाची वाट बघत नव्या कोऱ्या गाण्याची प्रतीक्षा करतो तसेच हे लेख स्वतंत्र, स्वयंसिद्ध आणि स्वयंपूर्ण आहेत. म्हटले तर एका बैठकीत वाचून संपवा, किंवा चवी-चवीने एक-एक लेख निवांतपणे वाचा. दोहोत तितकाच आनंद अनुभवास येतो. लेख प्रमाणबद्ध शरीर सौष्ठव लाभलेल्या सौंदर्यवती नवयौवनेसारखेच आहेत. कुठेही फाफटपसारा नाही, मात्र मॅटर बघावे तर पूर्णत्वास पोचलेले!

विश्वास सरांच्या लेखनशैलीविषयी त्यांच्या आधीच्या सात पुस्तकातून ओळख झाली, ती या पुस्तकांतून वर्धिष्णू झाली. साधी सोपी सरळ भाषा! गुंत्यात गुंता नाही, मात्र अनुभव 'गुंतता हृदय हे' असाच! भ्रमर एकदा का मधुर मधुकणांची आस बाळगून कमलदलात गुंतला की बाहेर येण्याचं विसरून जातो, तद्वतच हे पुस्तक वाचायला सुरुवात केलीत की शेवटचे पान येईस्तोवर आपण थांबत नाही. (आले तरी दोन पर्याय आहेत, एक तर यातील आपल्या आवडत्या प्रांतातील लेखांचा फिरफिरुनि आस्वाद घ्यावा अथवा याच कोजागिरीला लेखकाची प्रकाशित झालेली आणिक दोन पुस्तके आहेतच! मंडळी, त्यांच्याविषयी नंतर!)

वाचकहो, प्रत्येक लेखाचा उहापोह करण्याचा मोह मी जाणीवपूर्वक टाळलाय. आपणही उत्सुक व्हावे आणि आणखी काय काय असेल बरं यात, हा प्रश्न स्वतःला विचारत हे पुस्तक वाचावे, हा माझा एकमेव उद्देश आहे! आता माझा सवाल ऐका मंडळी! सूर्याची धगधगीत उग्र किरणे नाहीत, उन्हाचा रखरखाट नाही, तर मुग्ध, मनोहर, शांत, शीतल, सौम्य, पवित्र आणि धवल चंद्रप्रकाशाची जाळी विखुरलेली आहे. निशिगंधाच्या धुंद सुगंधाने आसमंत अन आपलं मन भारून टाकलंय. या नीरव शांततेत काळ्याभोर रंगाच्या अन चांदण्यांच्या टिकल्यांचे नक्षीकाम असलेल्या चंद्रकळेच्या महावस्त्राने नटलेल्या निशेचे निश्चल मनमोहक सौंदर्य अनुभवायचे आहे कां? मग या पुस्तकातील शब्दफुले कधीही वेचा, चांदण्या रात्रीच्या निखळ सौंदर्याची आपल्याला नक्कीच भुरळ पडेल, हा झाला माझा अनुभव! अन तुमचा?

**डॉ. मीना श्रीवास्तव**
**ठाणे भ्रमणध्वनी – ९९२०१६७२११**
**ई-मेल-**
**RMEENASHRIVASTAVA21@GMAIL.COM**

**पुस्तकाचे प्रकाशक-सोहम क्रिएशन अँड पब्लिकेशन, पुणे**
**पृष्ठसंख्या- १६८ पाने**
**पुस्तकाचे मूल्य-२०० रुपये**



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

# यशस्वी जीवनाची मार्गदर्शक 'गुरुकिल्ली'

आधुनिक केसरी

**'कर्तृत्वाला प्रयत्नांचे अश्व जुंपायचे असतात. एकच दिशा ठरवायची असते. निग्रहाचे लगाम हातात ठेवायचे असतात आणि सातत्याचा चाबूक स्वतःवरच उगारायचा असतो. असं केलं तरच 'व्यक्ती' च्या गावापासून 'व्यक्तिमत्त्वा' च्या महानगरीपर्यंतचा प्रवास होतो' लेखक व. पु. काळे यांनी व्यक्तित्वाचा प्रवास किती सहजपणे मांडला आहे. आपण आपल्या आजुबाजुला अशी उदाहरणं पाहिली असतील, पुस्तकांमधून वाचली असतील, ज्यांनी सामान्यातून असामान्यत्व निर्माण केले.**

जीवनाला योग्य दिशा मिळण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. अशाच यश मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या, तरुण - तरुणी, शालेय ,महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रात आपले करियर घडवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या अर्थात प्रत्येक वयोगटातील व्यक्तींसाठी 'स्व - यशाची गुरुकिल्ली' हा लेखसंग्रह उत्तम मार्गदर्शक आहे. आपल्या जीवनात यशस्वी वाटचाल करण्यासाठी एखादा मार्गदर्शक आवश्यक असतोच, तोच आपल्याला ध्येयापर्यंतचा मार्ग दाखवतो पण त्यावर मार्गक्रमण आपल्यालाच करायचे असते. जसे घरी आपले आई- बाबा , शाळेत आपले शिक्षक आपल्यावर योग्य ते संस्कार घडवतात. असे कर किंवा असे करू नको, चांगले काय आणि वाईट काय याची जाणीव करून देतात. 'गुरुवीण सुने सारे विश्व हे सकल' त्याच प्रमाणे ' स्व - यशाची गुरुकिल्ली' हे पुस्तक एखाद्या गुरुप्रमाणे आपल्याला दिशा दाखवण्याचे कार्य करते आहे.


या पुस्तकात लेखक संदेश लाळगे, सहलेखिका स्वाती राणे- भगत आणि मृणाली पिळणकर या त्रिकुटाने मिळून यशाच्या विविध गुरुकिल्ल्यांविषयी अगदी सोप्या आणि नेमक्या शब्दात मांडणी केली आहे.या पुस्तकाचे डॉ. लिडविन डायस ( प्राचार्य - कॉलेज ऑफ सोशल वर्क, मुंबई ) आणि संदेश लाळगे यांनी सुयोग्य पद्धतीने संपादन केले आहे. या लेखसंग्रहात एकूण ३० गुरुकिल्ल्यांचा समावेश करून त्याद्वारे नेमकेपणाने चर्चा केली आहे.

या लेखसंग्रहातील अत्यंत महत्त्वाची बाब जी लक्ष वेधून घेते, ती म्हणजे यात 'स्व'ला केंद्रस्थानी ठेवून माणसाला स्वतःच्या अंतर्मनात डोकावण्याची संधी देणारे आणि प्रोत्साहन देणारे लेख. ज्यांनी आपल्या जगण्यातील आत्मविश्वास गमावला आहे, ज्यांचं जीवन दिशाहीन झाले आहे, काय करावे हे उमगत नाही, अशा निराशेने ग्रासलेल्या सर्वांसाठी हा लेखसंग्रह 'संजीवनी' आहे. बहुतेकदा असे होते, की लोक काय म्हणतील, यांवर निर्णय घेतले जातात. स्वतःला काय वाटते, याचा विचार करतो क्‍ा आपण ?

लेखक संदेश लाळगे यांनी 'स्व - ओळख ' या लेखात स्वतःच्या मनाशी संवाद साधून आपल्या आवड़ीनिवडी , आपली मते यावर विचार करण्यास सांगितले आहे. आपण स्वतःला किती ओळखतो, याची जाणीव या लेखाद्वारे होईल. 'सामर्थ्य', 'आवड', 'स्पष्टता- एक शस्त्र', 'वेळेची जादू' , 'प्रयत्न' , 'हेतू' , 'लवचिकता' या आणि अशा विविध घटकांविषयी या लेखसंग्रहात माहिती देण्यात आली आहे.

यश प्राप्त करण्यासाठी ज्या गोष्टीवर भर द्यायला हवा, त्या प्रत्येक घटकांवर यात चर्चा करण्यात आली आहे. आपल्यातील क्षमता, कौशल्य ओळखून तसेच आपल्यातील कलागुणांसोबत ज्या नकारात्मक गोष्टी आहेत, त्यावर काम करणं गरजेचे आहे. विचार ही अशी शक्ती आहे, ज्याने आपण ठाम निर्धार करून इच्छित ध्येय प्राप्त करू शकतो. आपल्या मनाची शक्ती, ताकद किती अफाट आहे, याची जाणीव हे पुस्तक करून देते. लेखिका स्वाती राणे - भगत यांनी ' निर्णयाची प्रक्रिया' , 'संयम' , 'निरीक्षणाचा क्षण ' या लेखांतून व्यक्तीने कोणत्या गोष्टी अंगिकारल्या पाहिजेत तसेच आपल्या स्वभावात कोणते बदल केले पाहिजेत , अर्थात जी जीवनमूल्ये प्राप्त केली आहेत, त्यावर बारकाईने विचार करण्याचा दृष्टिकोन विशद केला आहे. प्रत्येक गुरुकिल्ली उलगडून सांगताना या त्रिदलाने समर्पक उदाहरणं देऊन त्या त्या गुरुकिल्लीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. सोबतच प्रत्येक लेखाच्या शेवटी जाणीवपूर्वक काही प्रश्न दिले आहेत, लेख वाचल्यानंतर त्या प्रश्नांची उत्तरे लिहिली तर अर्धेअधिक जीवनाचे प्रश्न अलगदपणे उलगडतील, याची खातरी वाटते.

लेखिका मृणाली पिळणकर यांनी, ' चिकाटी' , 'कौशल्य', 'सकारात्मक दृष्टिकोन' , 'प्रेरणा' , 'नम्रपणा' या लेखांमधून विचारांसोबतच दृष्टिकोनाची व्यापकता निदर्शनास आणून ध्येयप्राप्तिसाठी डोळ्यांसमोर आदर्श असायला हवे, तसेच आपल्यातील कौशल्य ओळखून त्यानुसार पुढील आखणी कशी करायची याबाबत मार्गदर्शन केले आहे तसेच कोणतेही कार्य करताना आपल्यातील विन्रमता जपणं आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.आपण यशस्वी झालात पण त्यात जर अहंकार झळकला तर सगळे प्रयत्न शून्य ठरतात.




या लेखसंग्रहातून यशस्वी होण्यासाठी जे प्रयत्न करावे लागतात, जी स्वभाववैशिष्ट्ये आत्मसात करावी लागतात, याबाबत माहिती तर दिली आहेच पण मिळवलेले यश कसे टिकवावे , याबद्दल सुद्धा परामर्श घेण्यात आला आहे. सहसा पालक मुलांकडून अवाजवी अपेक्षा ठेवतात. मुलांना त्यांच्या आवडीनुसार क्षेत्र निवडण्याची संधी द्या. मग बघा, मुले कशी नाव कमावतील! मुलांना त्यांच्या आवड़ीच्या क्षेत्रात नावलौकिक मिळवण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे, हा महत्त्वपूर्ण संदेश या पुस्तकातून नकळतपणे दिला आहे.

या गुरुरूपी गुरुकिल्लीचा सदुपयोग केल्याने नक्कीच या गुरुकिल्लीने यशस्वितेची कवाडे खुली होतील. संशोधन आणि प्रकाशन विभाग, कॉलेज ऑफ सोशल वर्क ( स्वायत्त ) तर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले असून या पुस्तकाला साहित्यिक, नाट्यसिने कलावंत अभय पैर यांनी मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे. तसेच पुस्तकाचे मुखपृष्ठ अभिषेक भगत यांनी साकारले आहे.

( स्व- यशाची गुरुकिल्ली - लेखसंग्रह / लेखक : संदेश लाळगे, स्वाती राणे- भगत , मृणाली पिळणकर / संपादक : डॉ. लिडविन डायस ,संदेश लाळगे/ प्रकाशक : संशोधन आणि प्रकाशन विभाग, कॉलेज ऑफ सोशल वर्क ( स्वायत्त ) मुंबई / मूल्य : १५० रुपये )

# जिल्हा न्यायालयाच्या नवीन विस्तारित इमारतीच्या बांधकामाचा मार्ग मोकळा

## मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे चंद्रपूरच्या वैभवात पडणार भर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** एखादा विषय हाती घेतला की तो पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करण्यात सुधीर मुनगंटीवार यांचा हातखंडा आहे. त्यांच्या या खास कार्यशैलीची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. आणि यंदा विधी क्षेत्रच त्याचे साक्षीदार ठरले आहे. मुनगंटीवार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे चंद्रपूर येथील जिल्हा न्यायालयाच्या नवीन विस्तारीत सात मजली इमारत बांधकामाचा मार्ग मोकळा झाला आहे. या कामासाठी राज्य शासनाने ६० कोटी ७६ लक्ष रुपये मंजूर केले आहेत. राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळेच २०१७ पासून प्रलंबित असलेला विषय आता मार्गी लागला आहे.

जिल्हा न्यायालयाच्या नवीन विस्तारीत इमारतीचा प्रस्ताव चंद्रपूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी शासनाला पाठवला होता. त्याआधारे महाराष्ट्र आणि गोवा बार काउन्सिलचे अध्यक्ष ॲड. पारिजात पांडे, चंद्रपूर जिल्हा बार असोसीएशनचे अध्यक्ष ॲड. अभय पाचपोर, सचिव ॲड. आशिष धर्मपुरीवार, उपाध्यक्ष ॲड. राजेश ठाकूर यांनी ना. सुधीर मुनगंटीवार यांना या विषयात लक्ष घालण्याची मागणी केली होती. चंद्रपूरच्या विधि क्षेत्रातील गरज लक्षात घेऊन पालकमंत्री मुनगंटीवार यांनी शासनस्तरावर या विषयाचा पाठपुरावा केला. जिल्ह्यातील न्यायदान प्रक्रिया अधिक गतीमान होण्यात इमारतीचा अडसर ठरू नये यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यामुळे शासनाने २९ नोव्हेंबर २०२३ रोजी चंद्रपूर येथील नवीन विस्तारीत न्यायालयीन इमारतीच्या बांधकामासाठी ६० कोटी ७६ लक्ष रुपये मंजूर केले आहेत. त्यामुळे सात वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुद्दा आता निकाली निघाला आहे. ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी प्राधान्याने या विषयाकडे लक्ष दिल्याबद्दल चंद्रपुरातील विधि वर्तुळातून त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

**१२ कोर्ट हॉल आणि अद्ययावत यंत्रणा**

चंद्रपूर जिल्हा न्यायालयाच्या नवीन विस्तारित इमारतीमध्ये एकूण १२ कोर्ट हॉल असणार आहेत. याठिकाणी अद्ययावत यंत्रणा आणि अत्याधुनिक सुविधांचा मेळ बघायला मिळणार आहे. अंतर्गत आणि बाह्य विद्युतीकरण, पाणीपुरवठा व मलनि:सारण, अग्नीशमन यंत्रणा, सुसज्ज वाहनतळ, वातानुकुलित यंत्रणा, वाढीव क्षमता असलेले उद्वाहन (लिफ्ट), सीसीटीव्ही, पॉवर बॅकअप आदींची तरतूद कामांतर्गत करण्यात आली आहे. न्यायदान करणारी यंत्रणा आणि न्याय मागण्यासाठी येणारा सर्वसामान्य माणूस यांची मुलभूत सोयीसुविधांच्या बाबतीत गैरसोय होणार नाही सोबतच नोवोदीत अभिवक्त्यासाठी आसनाच्या व्यवस्थेची पूर्ण काळजी बांधकामादरम्यान घेतली जाणार आहे.

# बनावट दस्तऐवज बनवत जप्त वाहन आगारातून पळवले

## आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** मंडळ अधिकाऱ्यांनी अवैध गौण खनिज वाहतुक करणारे वाहन जप्त करून लासलगाव बस आगारात उभे केले होते. मात्र चक्क प्रांताधिकारी यांचेच बनावट दस्तावेज तयार करून ते आगाराच्या सुरक्षा रक्षकाला दाखवून खरे भासवत वाहन पळविल्याची अजब घटना घडली असून याप्रकरणी मंडळ अधिकारी यांच्या फिर्यादीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी संतोष त्रंबकराव डुंबरे हे विंचुर महसुल विभागात मंडळ अधिकारी म्हणुन नेमणुकीस असुन त्यांनी दि.४ जुलै रोजी एम.एच ०४ सी.डब्ल्यू ४९९२ या नंबरचा अनाधिकृत गौण खनिज मुरम भरलेला ढंपर पकडुन पुढील कारवाईसाठी लासलगाव बस आगारातील सुरक्षा रक्षकाचे ताब्यात देवुन लावुन ठेवला होता. यातील आरोपी राजु चितांमण ढोकळ रा.सिन्नर याने मा.उपविभागिय दंडाधिकारी निफाड यांचेकडील आदेश क्र- जमाबंदी/ अ.गौणखनिज/ एस.आर/ १९/ २३ दिनांक ०३/०८/२०२३ अन्वये खोटा आदेश बनावटीकरण करुन तयार करुन तो खरा आहे असा सुरक्षा रक्षकास भासुवन सदर ढंपर फसवेगिरी करुन घेवुन गेला म्हणुन आरोपी ढोकळ याचे विरोधात सी.सी.टी.एन.एस गु.र.न. जी २८२/२०२३ भा.द.वि.कलम ४२०, ४६८,४७१ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत स.पो.नि.राहुल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उपनिरीक्षक ए.के.मोकळ अधिक तपास करीत आहेत.

# ‘विकसित भारत संकल्प यात्रे’च्या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत पोहचा : पाटील

## तीन गावांना भेटी, जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात 23 नोव्हेंबर 2023 पासून ‘विकसीत भारत संकल्प यात्रेचा’ शुभारंभ करण्यात आला आहे. जिल्ह्यातील 825 ग्रामपंचायतीमध्ये सदर यात्रेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. ज्यांना आतापर्यंत शासकीय योजनांचा लाभ मिळाला नाही, अशा लाभार्थ्यांपर्यंत पोहचण्याच्या उद्देशाने प्रत्येक यंत्रणेने यात गांभिर्याने काम करावे, अशा सुचना केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाचे सहसचिव तथा विकसित भारत संकल्प यात्रेचे चंद्रपूर जिल्ह्याचे नोडल अधिकारी आनंद पाटील यांनी दिल्या. तत्पुर्वी विकसित भारत संकल्प यात्रेदरम्यान त्यांनी तीन गावांना भेटी दिल्या व गावक-यांशी संवाद साधला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकार विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., मनपा आयुक्त विपीन पालीवाल, उपायुक्त चंदन पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) मिना साळूंके यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते. या यात्रेच्या माध्यमातून विविध विभागांनी स्वतःहून लाभार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे, असे सांगून सहसचिव आनंद पाटील म्हणाले, आपल्यापर्यंत लाभार्थी येण्याची वाट पाहू नका. जिल्ह्यात ज्या ठिकाणी या यात्रेचा चित्ररथ जाईल, तेथे संबंधित वरिष्ठ अधिका-यांनी भेटी द्याव्यात. प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर योजनेचा लाभ मिळालेल्या किमान तीन लाभार्थ्यांचे मनोगत घ्यावे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा यात समावेश करावा तसेच योजनेचे व्हीडीओ क्लिप करून ते यात्रेदरम्यान दाखवावे. यात्रा सुरू होण्यापूर्वी जिल्ह्यात किती लाभार्थी होते, आणि उपक्रम झाल्यानंतर किती लाभार्थ्यांना लाभ दिला, त्याचीही आकडेवारी आतापासून गोळा करा.

पुढे ते म्हणाले, केंद्र सरकारकडून विकसीत भारत संकल्प यात्रा हा महत्वाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. शहरी आणि ग्रामीण भागात 17 महत्वाच्या योजनांची माहिती या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविण्यात येत आहे. ज्यांना आतापर्यंत कोणत्याच योजनांचा लाभ मिळाला नाही, अशा नागरिकांपर्यंत पोहचण्याचा हा प्रयत्न आहे.



# मराठा समाज, सर्व पक्षीय कार्यकर्ते आक्रमक

## तहसीलदार यांना निवेदन सादर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील सकल मराठा समाज सर्व पक्षीय कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले असुण तहसील कार्यालयात प्रांगणात एकत्रित येत विविध घोषणा देत परिसर दणाणून सोडले व मा तहसीलदार स्वरुप कंकाळ यांना निवेदनाद्वारे आपल्या भावना व्यक्त केल्या.

गत दोनतीन महिन्यांपासून सकल मराठा समाज, मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र भर सरसकट कुणबी मराठा जाती प्रमाणपत्र द्या तथा ओबीसीत समाविष्ट करा असी मागणी लावून धरली आहे. तर याचा महाराष्ट्र भर परिणाम जाणवत आहे. तर डिसेंबर २४ ही तारिख ठरली आहे. त्यात त्यासाठी जरांगे यांचा तिसरा दौरा सुरु झाला आहे यात जरांगे विरुध्द मंत्री भुजबळ यांची खडाजंगी सुरु आहे त्यात मंत्री मा. भुजबळ हे जरांगे पाटील यांच्यावर आक्रमक शाब्दिक तोफ डागत असल्याने व सरसकट कुणबी मराठा आरक्षण रद्द करावे असे विरोध मंत्री करत असल्याने खुलताबाद तालुक्यातील सर्व पक्षीय कार्यकर्ते पदाधिकारी आक्रमक झाले असुण शिंदे सरकार मधील मंत्री भुजबळ यांचा राजीनामा घ्या असी मागणी सकल मराठा समाज सर्व पक्षीय कार्यकर्त्यांनी केली असुन दि.२९रोजी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.तदपुर्वी अनेक पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करत विविध घोषणा देत सरसकट कुणबी मराठा आरक्षण व मंत्री भुजबळ यांचा राजीनामा घ्या असी मागणी सकल मराठा समाज सर्व पक्षीय कार्यकर्त्यांनी यावेळी केले. तालुक्यातील मोठ्या संख्येने सर्व पक्षीय कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. राजीनामा न झाल्यास पुढे पुन्हा तीव्र आक्रमकताने आंदोलन करत रस्त्यावर उतरु असे निर्धार करण्यात आला.

# ‘बालविवाह, पोक्सो कायदा’वर जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** केंद्रीय विद्यालय आयुध निर्माणी, भद्रावती येथे जिल्हा चाइल्ड हेल्पलाईन आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने “बालविवाह आणि पोक्सो कायदा” या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी, महाविद्यालयाच्या प्राचार्या स्वाती विश्वकर्मा, शिक्षिका ममता बावनकर, चाईल्ड हेल्पलाइनचे समन्वयक अभिषेक मोहूर्ले, अंकुश कुराडे आदींची उपस्थिती होती.

यावेळी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा अर्थात लैंगिक अपराधापासून बाल संरक्षण अधिनियम-2012 मधील विविध तरतुदी उदाहरणासह समजावून सांगितल्या तसेच विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले.




# मुदत संपण्याच्या उंबरठ्यावर कुणाच्या सोयीसाठी पंचवार्षिक लिलावाची खैरात?

## लिलाव रद्द न झाल्यास बोंब मारो आंदोलनचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** नगरपालिकेच्या पंचवार्षिक मुदत संपण्यास कांहीं दिवसांचा कालावधी शिल्लक असताना स्वहित व कार्यकर्त्यांच्या सोयीसाठी एका वर्षाऐवजी चक्क पाच वर्षांचे पंचवार्षिक लिलाव काढण्याचा ठराव घेण्यात आला असून सदरील ठराव रद्द करण्यात यावा अन्यथा पालिकेवर बोंब मारो आंदोलन करण्यात येईल असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष सतीश अनेराव यांनी मुख्याधिकाऱ्याना दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे. पुढील वर्षीच्या अर्थात २०२४ च्या २९ जानेवारी रोजी लोहा पालिकेच्या पंचवार्षिक सभागृहाची मुदत संपुष्टात येत असून त्यानुषंगाने सद्याच्या सभागृहाने पूर्वी १० नोव्हेंबर रोजी लिलाव घेतला व तो रद्द देखील केला. टेंडर धरकांची भरणा केलेली अनामत रक्कम परत केली ती कोणत्या निकषांवर असा सवाल करून निवेदनात पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, दि. ४ डिसेंबर रोजी पंचवार्षिक लिलाव घेण्यात येणार आहे. तो लिलाव सभागृहाची कालमर्यादा लक्षात घेवून पाच वर्षांचा न करता तो एका वर्षांचा करावा. अन्यथा न्यायालयात दाद मागू असे नमूद करत डिसेंबर महिन्यात होणारा लिलाव रद्द न केल्यास दि. ५ रोजी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने बसस्थानक ते लोहा पालिका असा बोंब मारो आंदोलन करण्यात येईल असा इशारा पालिका मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष सतीश आनेराव यांची स्वाक्षरी आहे.



महाराष्ट्रातील गोरगरिबांचे व शेतकऱ्यांच्या मुलांच स्वप्न असतं की आपण सरकारी नोकरीत रुजू होऊन आपल्या आई-वडिलांची मान उंच करावी, याच अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून 2021 ला पोलीस भरती होती. त्या नंतर 2023 ह्या वर्षी पोलीस भरतीची जाहिरात निघालेली नाही. त्यामुळे पोलीस भरतीचा सराव करणाऱ्या विद्यार्थ्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, असे निवेदनद्वारे जिल्हा अधिकारी यांना सांगण्यात आले. त्यासाठी 2023 या वर्षासाठी लवकरात लवकर पोलीस भरती जाहीर व्हावी, अशा आशयाची मागणी आपण माननीय मुख्यमंत्री महोदय यांना करावे, अशी धुळे येथील विद्यार्थ्यांकडून विनंती करण्यात आली.

# तुमचे पाल्य अनधिकृत शाळेत तर नाहीत ना?

आधुनिक केसरी न्यूज

**शासन मान्यता नसताना चालणाऱ्या वर्गात शिकणारे विद्यार्थी -गितांजली पब्लीक स्कुल करखेली- इयत्ता तिसरी -४ विद्यार्थी, चौथी - २,पाचवी - ३ सहावी - १, सातवी - १ . रायझिंग सन इंग्लिश स्कुल करखेली - इयत्ता पहिली -९ विद्यार्थी, दुसरी - ७ ,तिसरी - ३ चौथी - १ .ह्या विद्यार्थ्यांच्या भविष्याची जबाबदारी कोण घेणार?**

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** लोक पैशासाठी काय करतील याचा भरवसा नाही! आपण बांधकाम, स्वस्त धान्यदुकान, मद्यविक्रीसह अनेक क्षेत्रातील बेकायदेशीरपणे चालणाऱ्या व्यवसायाच्या सुरस कहाण्या ऐकल्या होत्या, आता मात्र याचे लोण शिक्षण क्षेत्रात येऊन पोहचले आहे. धर्माबाद तालुक्यातील काही शाळाच अनाधिकृत असल्याचे धक्कादायक प्रकार सामोरं आले आहे. ज्ञानदान हे सर्वश्रेष्ठदान आहे, संपत्ती ज्ञान दिल्याने वाढते हे सर्व आपण शिक्षण क्षेत्रासाठी ऐकले होते. शैक्षणिक क्षेत्राकडे लोकांचा बघण्याचा हेतू ही उदात्त होता. मात्र अलीकडे शाळा हे ज्ञानदानाचे कमी अमाप कमाईचे साधन अधिक झाले आहे. त्यामुळे या क्षेत्रात अनेक व्यावसायिक उत्तरले आहेत. शिक्षण ही बाजारू वस्तू झाली आहे. ज्यांच्याकडे दाम असेल त्यांच्यासाठीच या चकचकित शाळांचे दार खुले आहेत.मग यासाठी शासनाची परवानगी घेण्याची ही तसदी घेतली जात नाही. धर्माबाद तालुक्यात ही अनेक शाळा अनाधिकृत असल्याची तक्रार पंचायत समितीकडे प्राप्त झाल्यानंतर धर्माबाद प. समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांनी एस. एन. माळगे यांची चौकशी समिती गठीत करून आपला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. या समितीने सादर केलेल्या अहवालात धक्कादायक प्रकार सामोरं आला असून करखेली येथील गितांजली पब्लीक स्कुल करखेलीच्या तिसरी ते सातवी च्या वर्गाना परवानगीच नाही आहे.तर रायझिंग सन स्कुल करखेलीच्या पहिली ते चौथीचे वर्ग अनधिकृत आहेत. या दोन्ही शाळांच्या वर्गाना शासनाची परवानगी नसताना ह्या शाळा अनधिकृतपणे कोणत्या उदात्त हेतूने चालू होत्या? पंचायतसमिती ने यांना केवळ इशारा देऊन का मोकळे सोडले? विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि पालकांच्या भावनाशी खेळण्याचा अधिकार यांना कोणी दिला? हे प्रश्न अनुत्तारित आहेत. मात्र आपले पाल्य अनधिकृत शालेत तर नाहीत ना? याची काळजी पालकांनी घेणे आवश्यक आहे. हे यातून सामोरं आले आहे.

# सिन्नरमधून बाल कामगारांची सुटका

आधुनिक केसरी न्यूज



**नाशिक :** सिन्नर परिसरातील वेगवेगळ्या ठिकाणी काम करणाऱ्या तीन बालकामगारांची सुटका करण्यात आली आहे. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या बालकामगारांना बालगृहात पाठवले आहे. सिन्नर बस स्थानक परिसरात आई सप्तश्रृंगी वडापाव सेंटर हे सुदर्शन नाईक यांचे छोटे दुकान आहे. या ठिकाणी १३ वर्षांचा बालक हा काम करत असल्याची तक्रार कामगार उपआयुक्त कार्यालयात दाखल करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत संबंधित बालकामगाराची सुटका करण्यात आली. संबंधित बालकाला कमी वेतन देत त्याच्याकडून जादा श्रमाचे काम करून घेतले जात होते. या प्रकरणी सिन्नर पोलीस ठाण्यात नाईक यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिन्नर येथील पंचवटी मोटेल्स उडपी तडका येथे काम करणाऱ्या दोन बालकामगारांचीही सुटका करण्यात आली. त्यात नेपाळ येथील १३ वर्ष पाच महिने वयाच्या आणि १२ वर्ष, पाच महिने, आठ दिवस वयाच्या बालकांचा समावेश आहे. सिन्नर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. या प्रकरणी संशयित सुरेश पुजारी, रवीश मुल्की यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# देवस्थानाच्या जागेवर अतिक्रमण; घरे व रस्ता निर्मिती; लोहानगर पालिकेसमोर उपोषण सुरू



आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** नगरपालिकेत विद्यमान नगराध्यक्ष यांच्या कार्यकाळात झालेल्या गुंठेवारी , विद्युत साहित्य, एलईडी, सौर दिवे, ब्लिचिंग पावडर, तुरटी खरेदी, वृक्षारोपण तसेच विठ्ठलेश्वर मंदिर देवस्थानावरील अतिक्रमण व त्यात नगर पालिकेने केलेले रस्ते असा सर्व कामात आर्थिक अनियमितता असून त्याची चौकशी करावी या मागणी साठी सामाजिक कार्यकर्ते मारोती शेळके यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. लोहानगर पालिकेचा कार्यकाल अवघ्या महिना-दोन महिन्यात संपणार आहे.या पाच वर्षात नगर पालिकेत प्रचंड अनियमितता आहे असे वारंवार चर्चिले जात असतानाच आता या सगळ्या कामाची कसून चौकशी व्हावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते मारोती व्यंकटी शेळके यांनी जिल्हाधिकारी यांना दोन पानांचे सविस्तर निवेदन दिले आहे. नगर पालिके समोर त्यांनी २९ तारखेपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. विद्यामान नगराध्यक्ष यांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात गुंठेवारी झाली त्यात प्रचंड प्रमाणात अनियमितता आहे नागरिकांना शुल्क आकारून पावत्या दिल्या नाहीत, त्यासाठी स्वतंत्र खाते काढले नाही.गुंठेवारी परवानग्या मागील तारखेस दाखविण्यात आल्या आहेत, असे आरोप उपोषण कर्त्यांनी केले आहेत. एलईडी, रस्त्यावरील पोल, सौर ऊर्जा लाईट या कामाची, ब्लिचिंग पावडर, तूरटी, घनकचरा, तसेच विठठलेश्वर मंदिर देवस्थान सर्व्हे नंबर ४९ मधील अतिक्रमणे व त्यात झालेले नाली रस्ते या कामाची व अन्य कामाची चौकशी व्हावी यासाठी मारोती शेळके यांनी बुधवार पासून नगर पालिके समोर आमरण उपोषण सुरू केले आहे.तसेच लोहा पोलिसात त्यांनी तक्रार दिली त्या अनुषंगाने चौकशी सुरू आहे. या उपोषणाच्या पहिल्या दिवशी शहरातील जागरूक नागरिकांनी भेटी दिल्या व पाठींबा दर्शवीला आहे. मुख्याधिकारी श्रीमती टोंगे यांनी उपोषण करू नये चौकशी सुरू असे असे मारोती शेळके याना कळविले व त्यांनी आपले उपोषण सुरू केले आहे. यावर नगर पालिका प्रशासन कसा तोडगा काढते याकडे शहराचे लक्ष आहे.

# तर उरण रेल्वे उद्घाटनाला ग्रामस्थ करणार विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** उरण तालुक्यात दोन ते तीन महिन्यात रेल्वे सेवा सुरु होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्टेशन नामकरणचा मुद्दा एरणीवर आला आहे. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी सिडको प्रशासनाने सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांना तसेच उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिश निकम यांना २९/११/२०२३ रोजी सकाळी ११:३० वाजता सिडको भवन, सिबिडी बेलापूर, नवी मुंबई येथे बैठकीसाठी बोलाविले होते. बैठकीत उरण मधील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थांनी जोपर्यंत रेल्वे स्टेशनला स्थानिक महसूली गावांची नावे देण्यात येणार नाही तोपर्यंत उरण मधील कोणत्याही रेल्वे स्टेशनचे उदघाटन होऊ देणार नाही अशी भूमिका घेतली आहे.

नवघर, बोकडविरा, कोटगाव, धुतूम, जासई या गावांची नावे त्या त्या रेल्वे स्टेशनला सिडको किंवा शासनाकडून न दिली गेल्यास वरील गावच्या ग्रामस्थांकडून तीव्र विरोध केला जाईल, असा सज्जड दम सिडको चे सहव्यवस्थापकीय अधिकारी शांतनू गोयल यांच्यासमोर सर्व ग्रामस्थांनी एका आवाजात दिला. गावांची नावे द्या ,नंतरच उरण रेल्वेचे उदघाटन " असे मिटिंगमध्ये स्पष्ट ठणकावून सांगण्यात झाले. बोकडविरा सरपंच अपर्णा मनोज पाटील,जासई सरपंच संतोष घरत, धुतूमचे प्रेमनाथ ठाकूर,उरणचे निलेश भोईर,नवघर ग्रामपंचायत सदस्य विश्वास तांडेल यांच्या सह रायगड भूषण प्रा.एल बी.पाटील,कॉम्रेड भूषण पाटील, भगवान पाटील,धीरज घरत,रुपाली खंडेश्वर पाटील,यशवंत ठाकूर, सुनील पाटील, नित्यानंद भोईर,माजी जि.प.सदस्य जनुशेठ भोईर, शिवसेना शाखाप्रमुख अविनाश म्हात्रे, योगेश तांडेल, नवेल तांडेल, प्रशांत पाटील, सौरभ घरत इ.गावोगावच्या प्रमुख कार्यकर्त्यांसह ५७ जणांची उपस्थिती होती. यावेळी सिडकोचे सहव्यवस्थापकीय अधिकारी शांतनू गोयल यांनी समस्या ऐकून गावांच्या नावांसंबंधी शासनाकडे प्रस्ताव पाठविला जाईल हे सांगितले.तसेच पुढची मिटिंग ही सिडको आणि रेल्वेच्या अधिकाऱ्यांना घेऊन होईल. तसेच स्टेशनवर येणारी नोकरभरतीबाबत केलेली मागणी ऐकून घेतली. या मिटिंग मधून,गावांना नावांचा अधिकार मिळेल आणि नावे दिल्याशिवाय उरण रेल्वेचे उदघाटन रेंगाळणार हे निश्चित झाले आहे. त्यामुळे सिडको व रेल्वे प्रशासनाने उरण तालुक्यातील विविध रेल्वे स्टेशनच्या नामांतरच्या बाबतीत त्वरित निर्णय घ्यावा अशी मागणी नवघर, बोकडविरा, कोटगाव, धुतुम, जासई ग्रामपंचायतच्या सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थांनी केली आहे.

# अन्नसुरक्षा व स्वच्छता विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** येथिल इंग्लिश्स माध्यमिक विद्यालय संकुलात पंचायत समिती शैक्षणिक विभाग व श्री अँनालिटीकल टेस्टिंग अँड रिसर्च लँबरोटरी जळगाव यांचे संयुक्त विद्यमानाने पंतप्रधान पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत 592 स्वयंपाकी व मदतनीस यांचे अन्नसुरक्षा व स्वच्छता विद्यार्थी बिएमआय इ.विषयावर प्रशिक्षण दोन सत्रात आयोजित करण्यात आले. या प्रसंगी श्री सरोदे साहेब शिक्षण विस्तार अधिकारी संस्थेचे सचिव किशोर महाजन प्राचार्य. चव्हाण सर केंद्रप्रमुख रामभाऊ वानखेडे, विकास वराडे, धुंदाळे, अनिकेत आव्हारे, रईस पिंजारी यांनी अन्न सुरक्षा स्वच्छता या बाबत मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाचे औचित साधून सन 23-24मध्ये झालेल्या परसबाग स्पर्धा व पाककला कृती स्पर्धतील प्रथम व्दितीय तृतीय विजेत्याचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रशिक्षणाचे सुत्रसंचल श्री संजय पाटील केंद्रप्रमुख यांनी केले तर आभार श्री विकास वराडे केंद्रप्रमुख शहापुर यांनी मानले व प्रशिक्षणाची यशस्वीरित्या सांगता करण्यात आली.



# मंदिर संस्कृतीच्या रक्षणार्थ द्वितीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद' !

## मंदिर सरकारीकरण, मंदिरांवरील आघात, वनसंहिता लागू करण्यासह विविध विषयांवर होणार चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मंदिरे ही हिंदु धर्माची आधारशीला आहेत. त्यातून मिळणार्या ईश्वरी चैतन्यामुळेच आधुनिक काळातही समाज मंदिरांकडे आकर्षित होतो. त्यामुळे मंदिरांतील पावित्र्याचे रक्षण करणे, हे हिंदु समाजाचे दायित्व आहे. मंदिरातील देवतातत्त्व टिकवण्यासाठी मंदिरांत विधीवत पूजा-अर्चा करणे, प्राचीन मंदिर संस्कृतीचे संवर्धन करणे, मंदिरांच्या समस्यांचे निवारण करणे, मंदिरात येणार्या भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, दर्शनरांगांचे सुनियोजन करणे, तसेच मंदिर परंपरांचे रक्षण करणे यांसाठी मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, भक्त आदींचे संघटन आवश्यक आहे. त्यासाठी श्री विघ्नहर गणपति मंदिर देवस्थान, लेण्याद्री गणपती मंदिर देवस्थान, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान, हिंदु जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने 2 आणि 3 डिसेंबर 2023 यादिवशी श्री विघ्नहर सभागृह, ओझर, जिल्हा पुणे येथे द्वितीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला संपूर्ण महाराष्ट्रातून 635 हून अधिक निमंत्रित मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते, अभ्यासक आदी सहभागी होणार आहेत, अशी माहिती 'महाराष्ट्र मंदिर महासंघा' चे श्री. रमेश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी पत्रकार परिषदेला श्री घृष्णेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट चे विश्वस्त श्री चंद्रशेखर शेवाळे, पावन गणपती मंडळाचे श्री. प्रमोद नरवडे पाटील आणि हिंदु जनजागृती समितीच्या मराठवाडा संघटक कु. प्रियांका लोणे उपस्थित होत्या.

रमेश शिंदे पुढे म्हणाले, "या परिषदेसाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांना प्रत्यक्ष भेटून निमंत्रण देण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी शासनाच्या वतीने एक मंत्री उद्घाटन सत्राला उपस्थित राहील, असे आश्वासन दिले आहे. जळगाव येथे पहिल्या 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'त 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'ची स्थापना करण्यात आली




होती. त्यानंतर महासंघाचे कार्य उत्तरोत्तर वाढत असून केवळ 4 महिन्यांमध्ये ते संपूर्ण राज्यभर पोचले आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात केवळ 6 महिन्यांत 262 मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू करण्यात आली आणि दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. या परिषदेला 'हिंदु फ्रंट फॉर जस्टिस'चे प्रवक्ते आणि सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णुशंकर जैन, 'झी' 24 तास या वृत्तवाहिनीचे संपादक श्री. नीलेश खरे, यांसह श्री अष्टविनायक मंदिरांचे विश्वस्त, महाराष्ट्रातील जोतिर्लिंग देवस्थानांचे विश्वस्त, संत पिठांचे प्रतिनिधी, यासह देहूचे संत तुकाराम महाराज मंदिर, पैठणचे नाथ मंदिर, गोंदवले येथील श्रीराम मंदिर, रत्नागिरी येथील गणपतीपुळे मंदिर, श्री एकवीरा देवी मंदिर, अंमळनेर येथील मंगळग्रह मंदिर आदी मंदिरांचे विश्वस्त, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस, हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे आदी मान्यवर सहभागी होणार आहेत. या मंदिर परिषदेत मान्यवरांचे मार्गदर्शन, मंदिरांशी निगडीत विविध विषयांवर चर्चासत्रे होणार आहेत. यामध्ये 'मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे', 'मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे', 'वक्फ कायद्याद्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यांवर उपाय मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यांच्या परिसरात मद्यमांसबंदी; दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आदी विषयांवर चर्चा होणार आहे. ही परिषद केवळ निमंत्रितांसाठी असून यामध्ये सहभागी होण्यासाठी 7020383264 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर महासंघाने केले आहे.

# चेअरमनपदी गोरख वालझाडे तर व्हाईस चेअरमनपदी विद्या शहाणे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** सहकार दृष्ट्या महत्वाची व आर्थिक उलाढालीत अग्रेसर असलेली तसेच घोटी व इगतपुरी तालुक्यात अग्रगण्य गणल्या जाणाऱ्या डॉ. हेगडेवार पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवडणूक नुकतीच पार पडली. घोटी येथील डॉ. हेडगेवार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची चेअरमन व व्हाइस चेअरमन पदाची निवडणूक बिनविरोध पार पडली. यामध्ये चेअरमनपदी गोरख वालझाडे यांची तर व्हाईस चेअरमनपदी सौ विद्या शहाणे यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीचे संपूर्ण परिसरातून कौतुक केले





जात आहे. या निवड़ीसाठी संस्थेच्या सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळाची विशेष बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून अर्चना सैंदाने यांनी काम पाहिले. यावेळी चेअरमन पदासाठी गोरख वालझाडे यांचा तर व्हाईस चेअरमन पदासाठी सौ विद्या शहाणे यांचा या पदांसाठी प्रत्येकी एकेक अर्ज दाखल झाल्याने ही निवड बिनविरोध झाल्याचे निवडणूक अधिकारी अर्चना सैंदाने यांनी घोषित केली. यावेळी संचालक मंडळातील संचालक हेमंत सुराणा, सुनील पिचा, मोहन बबरेवाल, राजाभाऊ भंडारी, संपतराव म्हसणे, किरण फलटणकर, मंजिरी जाधव, दिलीप भन्साळी, योगेश हाके, बन्सीलाल अंदोरे, व्यवस्थापक रितेश काजळे उपस्थित होते. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन घोटी गावातील अनेक मान्यवरांनी केले. घोटीतील सहकार क्षेत्रातील नेते मोहन भगत, नंदकुमार वालझाडे, विकास काळे, संजय आरोटे, संतोष दगडे आदींनी अभिनंदन केले.



# शेतकऱ्यांनी लावले बांधाला दरवाजे

आधुनिक केसरी न्यूज


**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे ताजनापूर येथे धाड नदीवर केलेले केटी कोल्हापूर बांधाला दरवाजे लावून अवकाळी पूरपाण्याची आयती संधी मिळाली असुण या पाणीसाठा सिंचन साठी शेतकऱ्यांचा फायदा होणार आहे. गत चार महिन्यांत पावसाळ्यांत ना मोठा पाऊस झाला ना नदीला पूर पाणी आले की शेतकऱ्यांनी ऑक्टोबर मधे केटीला ना दरवाजे लावले मात्र अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे नदीला पूर आला व शेतकऱ्यांनी केटीचे दरवाजे लावले याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. सावंगी महसूल मंडळ मधे अनेक केटी कोल्हापूर बांध उभारण्यात आलेले आहे.ना त्याना दरवाजे आहे ना कुणी दरवाजे लावले मात्र ताजनापूर येथील शेतकऱ्यांनी संधीचा फायदा घेतला आहे.दि.२६-२७ रोजी तुफान अवकाळी पाऊस झाला व त्यामुळे नदीला पूरपाणी आले. एक दिवस पुरपाणी वाहून वाया गेले परंतु शेतकऱ्यांनी संधीचा फायदा घ्याचा म्हणून आठदहा शेतकरी मिळून ताजनापूर येथील केटी कोल्हापूर बांधाला दरवाजे बंद करून पाणी साठा केला आहे.तो पाणी साठा शेत सिंचन साठी फायद्याचा ठरणार आहे. हे विशेष.

# बेकायदेशीररित्या शस्त्र जवळ बाळगल्याने न्हावा शेवा पोलीसांकडून आरोपीस अटक

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** दि. २७ नोव्हेंबर रोजी पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगळे यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराने एक इसम विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूलसह पनवेल तालुक्यातील मौजे गव्हाण गावाचे स्मशानभुमीचे परिसरात फिरत असल्याची खात्रीलायक माहिती दिली. पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगळे यांनी ताबडतोब सदरील माहिती न्हावा शेवा बंदर विभाग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव धुमाळ यांना दिल्यावर त्यांचे सुचनेवरून पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगळे, पोलीस हवालदार महेंद्रसिंग राजपूत, पोलीस हवालदार शिवाजी बसरे, पोलीस हवालदार संजय सपकाळ व पोलीस नाईक विशाल हिंदोळा यांचे विशेष पथक तयार करून सदरील बेकायदेशीररित्या अग्निशस्त्र बाळगणा-या इसमाचा शोध घेवून त्याचेवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सापळा लावला व सदर इसमास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेस डावे बाजूस पॅन्टचे आतमध्ये एक देशी बनावटीचे पिस्तूल मिळून आले. सदरचे पिस्तूल बेकायदेशीर पणे त्याने जवळ बाळगले म्हणून त्याचेवर न्हावाशेवा पोलीस ठाणेत गु.र.नं. २२३/२०२३ भारतीय हत्यार कायदा १९५९ चे कलम ३, २५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अजय बलवान सरपटा वय २२ वर्षे, धंदा नोकरी, रा. साईनगर वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड असे आहे.सदर आरोपी जवळ ३५,०००/- रू किंमतीचे देशी बनावटीचे पिस्टल, ज्याचे ग्रीपचे दोन्ही बाजूस लाकडाची मुठ असलेली पटटी स्कूने फिट केलेली, त्यामध्ये काळया रंगाचे मॅग्झीन त्यामध्ये ०२ जिवंत काडतूस आढळले आहे. १,२००/- रु किंमतीचे ०२ जिवंत काडतूस त्याचे पाठीमागील बाजूस KF 7.65 असे लिहलेले प्रत्येक काडतुसाची किंमत ६०० रू.आहे. सदर उल्लेखनिय कामगिरी मिलींद भारंबे पोलीस आयुक्त नवी मुंबई, पंकज डहाणे पोलीस उपायुक्त परिमंडळ ०२ पनवेल, धनाजी क्षिरसागर सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट विभाग यांचे मार्गदर्शनाखाली संजीव धुमाळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक न्हावाशेवा पो. ठाणे यांचे देखरेखीत न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगळे, पोलीस हवालदार महेद्रसिंग राजपूत,पोलीस हवालदार शिवाजी बसरे, पोलीस हवालदार संजय सपकाळ व पोलीस नाईक विशाल हिंदोळा यांनी केली आहे.सदर आरोपी शस्त्र विकण्यासाठी परिसरात आल्याचा संशय पोलिसांना आहे. बेकायदेशीरपणे शस्त्र जवळ बाळगणे व विकणे कायदेशीर गुन्हा आहे. त्यामुळे सदर आरोपीचा न्हावा शेवा पोलिसांमार्फत कसून चौकशी सुरु आहे. पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांनी या केलेल्या धाडसी कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# धनगर समाजाचे उपोषण मागे

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्र्यांसोबत उपोषणकर्त्यांच्या शिष्टमंडळाची समवेत बैठक लावून मागण्या संदर्भात चर्चा करण्याच्या आश्वासनावर गेल्या अकरा दिवसांपासून सुरू असलेले धनगर समाजाचे आमरण उपोषण अखेर पालकमंत्री संदीपान भुमरे मध्यस्थीने बुधवारी मागे घेतले. धनगर समाजाची अनुसूचित जमाती आरक्षण अंमलबजावणी करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी १९ नोव्हेंबरपासून शहरातील राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मारकाजवळ धनगर समाजाच्या वतीने हरिचंद्र वैद्य, संपत रोडगे, रंगनाथ राठोड यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. उपोषणाच्या सातव्या दिवशी उपोषणकर्ते संपत रोडगे यांची प्रकृती खालावल्यामुळे त्यांना प्रशासनाच्या वतीने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. या उपोषणाची दखल प्रशासन घेत नसल्याकारणाने समाजबांधवांनी मंगळवारी चक्काजाम आंदोलन करून सरकारचा निषेध नोंदवला. यामुळे बुधवार (दि.२९) रोजी मंत्री संदिपान भुमरे, आ. संजय शिरसाट, शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांनी सरकारच्या वतीने उपोषणकर्त्यांची भेट घेऊन चर्चा केली. उपोषणकर्त्यांच्या मागणीचे निवेदन स्वीकारून जे काही माझ्या स्तरावरचा विषय आहे तो मी लवकरात लवकर मार्गी लावतो. या विषयासंदर्भात हिवाळी अधिवेशनाच्या अगोदर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर उपोषणकर्त्यांच्या शिष्टमंडळात समवेत बैठक लावू, असे आश्वासन देऊन उपोषण मागे घेण्याची विनंती केली. संपूर्ण जिल्हा तालुक्यात समाजाच्या वतीने बैठका तालुकास्तरीय मोर्चे करून जिल्हाभरातील समाज आरक्षणाच्या मागणीसाठी एकत्र येणार असल्याचे उपोषणकर्त्यांच्यावतीने जाहीर केले. यावेळी समाजाचे नेते माजी सभापती अरुण रोडगे, सरपंच अशोक धर्मे, जगन्नाथ रिठे, रामनाथ मंडलिक, सर्जेराव भोंड, अंकुश धर्मे, अनंता बनसोडे, बाजीराव चोरमारे, विजय वैद्य, गणेश काळे, ॲड. संदीप नरोडे, दिलीप रिठे, बंटी सोनवणे, गणेश रोडगे, सुरेश डोळझाके, संतोष कोल्हे, संतोष थोरात, संजय फटांगडे, नारायण खोचे, संतोष सुरे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर येथील माथाडी कामगार कार्यालयाची विचार करणारी कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथे माथाडी मंडळ या कार्यालयाने कामगार मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्ण वाट लावलेली आहे. मागील वर्षी ज्या प्रकारे येथील माथाडी मंडळ कार्यालयाने आपली कार्य तत्परता दाखवली होती त्यावर कामगार मंत्री सन्माननीय श्री सुरेश खाडे साहेबांनी अतिशय तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली होती. व त्यांनी सांगितले होते की येणाऱ्या दिवाळीपर्यंत येथील माथाडी कामगारांची संख्या ही तिप्पट झालेली असेल त्याचप्रमाणे माथाडी मंडळाचे स्थानिक अध्यक्ष व कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत यांनी वेळोवेळी सांगितले होते की आम्ही येथील निरीक्षकांना एक विशिष्ट टार्गेट दिले असून त्या टार्गेट प्रमाणे येथील माथाडी कामगारांची संख्या निश्चित वाढलेली दिसेल परंतु यावेळी जेव्हा 2022 /23 चा बोनस वाटप करण्यात आला आणि येथील माथाडी कामगारांची संख्या जाहीर करण्यात आली तेव्हा कळले की तिप्पट संख्या होणे ते दूर पण येथील कार्यालयाने शंभर चा आकडाही पूर्ण केला नाही 2021/22 मध्ये येथील नियमित माथाडी कामगारांची संख्या होती 1818 .आणि हीच संख्या तिप्पट करण्यात येईल असे कामगार मंत्री महोदयाने जाहीरपणे सांगितले होते. परंतु ही संख्या तिप्पट न होता केवळ या संख्यामध्ये 78 माथाडी कामगारांची भर पडली पूर्ण 100 माथाडी कामगार हे येथील कार्यालयातून नियमित रोजगार प्राप्त करू शकले नाही. अशी ही या कार्यालयाची विचार करणारी कार्यप्रणाली आहे. संभाजीनगर जिल्ह्यामध्ये आज रोजी काही हजारो माथाडी कामगार काम करत आहेत यामध्ये रेल्वे धक्का, दौलताबाद येथील पोर्ट, अनेक ट्रान्सपोर्ट, कंपन्या, इतके सर्व असतानी सुद्धा केवळ 1896 कामगार आज रोजी या माथाडी मंडळ कार्यालयातून नियमित पगार घेत आहे. तेव्हा हे मंडळ माथाडी कामगारांसाठी किती प्रामाणिकपणे काम करत आहे? यावर कामगार मंत्री लक्ष देतील का? येथील निरीक्षक हे केवळ मालक-धार्जीन निर्णय घेतात या कार्यालयाच्या माध्यमातून माथाडी कामगारांना शासनाच्या योजनेचा लाभ येथील निरीक्षक मिळवून देतच नाहीत. याउलट मालक धार्जिन निर्णय घेऊन त्यांना कसा फायदा होईल याकडे लक्ष देत असतात जर येथील निरीक्षक, कार्मिक अधिकारी, सचिव, यांनी प्रामाणिकपणे जर कार्य केले तर महाराष्ट्र शासनाच्या एक चांगल्या उपक्रमाचा लाभ गोरगरीब मेहनती माथाडी कामगारांना मिळू शकतो. तेव्हा माथाडी मंडळावरती कामगार मंत्री महोदयांनी लक्ष देऊन अशा काम चुकार निरीक्षक, कार्मिक अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करावी अशी मागणी अनेक कामगार संघटनांनी केलेली आहे. त्यातच येथे निरीक्षकांनी माननीय कामगार न्यायालयांमध्ये 2013 पासून अनेक खटले दाखल केलेले आहेत पण अध्यापर्यंत एकाही खटल्या मधून माथाडी मंडळाच्या बाजूने निर्णय लागलेला नाही व माथाडी मंडळातील मजुरांना न्याय मिळालेला नाही आज रोजी ही हजारो माथाडी कामगार मजूर न्यायालयाकडे निर्णयाची वाट पाहत आहेत परंतु परिस्थिती जैसे थी वैसी आहे तसेच संभाजीनगर सुरक्षा रक्षक मंडळाचा कारभार याच कार्यालयाच्या माध्यमातून चालते व याच निरीक्षक



कार्मिक अधिकाऱ्यांवर सुरक्षारक्षक मंडळाचाही कारभार सोपवलेला आहे. येथील सुरक्षा रक्षक मंडळ हे 2004 पासून कार्यान्वित आहे परंतु 2004 ते 2023 पर्यंत केवळ 590 सुरक्षा रक्षक आज रोजी नियमित नोकरीवर आहे जेव्हा की खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीकडे हजारो सुरक्षारक्षक कार्य करत आहे एवढे सर्व असताना सुद्धा येथील सुरक्षा रक्षक मंडळ केवळ बघायची भूमिका घेऊन खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीच्या मालकांना पूर्ण सहकार्य करून त्यांच्या कसा फायदा होईल याकडे लक्ष देण्यासाठीच काम करत असल्याचे अनेक कामगार संघटनांनी या कार्यालयावरती आरोप केलेले आहेत .येणाऱ्या काळात तरी या कार्यालयाच्या माध्यमातून माथाडी कामगार आणि सुरक्षारक्षकांना न्याय मिळेल का याची शाश्वती आत्ता तरी देता येत नाही.

# फुलंब्रीत हजरत टिपू सुलतान जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज




**फुलंब्री :** शहरात शनिवारी शेर ए हिंद तथा स्वतंत्र सेनानी हजरत टिपू सुलतान यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, या निमित्ताने रक्तदान शिबिर, रुग्णांना फळे वाटप, तसेच सायंकाळी मिरवणूक काढण्यात आली होती.
दरवर्षी शहरात 20 नवंबर रोजी जयंती साजरी होते परंतु या वर्षी उमुमी इज्तेमा मुळे सदरील जयंती 25 नवंबर ला साजरा करण्याचा निर्णय जयंती उत्सव समिती कडून घेण्यात आल्याने शनिवारी जयंतीनिमित्त ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. नगर पंचायत कार्यालय च्या परीसरात भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले या वेळी बर्याच युवकांनी रक्तदान करुन आपला सहभाग नोंदविला.
तथा सायंकाळी स्वतंत्र सेनानी हजरत टिपू सुलतान यांच्या प्रतिमेची शहरातून मिरवणूक काढण्यात आली. यात शेकडो तरुणांनी सहभाग घेतला होता. याप्रसंगी स्वतंत्र सेनानी हजरत टिपु सुलतान रह. जयंती उत्सव कमिटी चे अध्यक्ष फरहान शहा, कार्याध्यक्ष अजय गंगावणे, उपाध्यक्ष जमाल शेख, विनोद कसारे, सचिव जावेद खान, सहसचिव शाहरुख पठाण, कोषाध्यक्ष इरफान सय्यद, सहकोषाध्यक्ष शेर खान, सरचिटणीस जाकेर पटेल, सहसरचिटणीस आवेज शहा, प्रसिद्धी प्रमुख पदी जाकेर आतार, सरफराज पटेल यांच्या सह माजी जिप अध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, पत्रकार इमरान खान, पत्रकार इस्माइल खान, शिवसेना उप तालुका प्रमुख अय्युब पटेल, कृऊबा संचालक अजहर सय्यद, समिर पठाण, जफर चिस्ती, मुदस्सर पटेल, अड. आसिफ पटेल, जमिर पठाण, फेरोज पठाण, राजु शहा, मोबीन पाशा, अनसार पटेल,मोबीन पटेल, रईस पटेल, गुड्डू शेख, आसेफ शेख,इमरान सय्यद, सलमान शेख, हारुण शेख, बबलु शेख इम्रान पटेल सह अन्य नागरीकांची उपस्थिती होती.

# पोलिसांच्या आशीर्वादाने अवैध दारूची वाहतूक

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये वडोद



बाजार गेवराई पायगाव, निमखेडा, साताळ , कायगाव, निल्लोड, पिरबावडा, कोलते टाकळी, तलवाडा, आडगाव ,येथे अवैध देशी दारूचे वडोद बाजार पोलीस स्टेशनचे कर्मचारी देशमुख यांच्या बीटमध्ये खोके मोटरसायकलच्या साह्याने सर्रास वाहतूक सुरू असून हे अवैध देशी दारू वाहतूक करणारे कुणालाच घाबरत नाही म्हणजे यांच्यावर आशीर्वाद कुणाचा आहे, असा नागरिकांना प्रश्न पडला रात्री व भरदिवसा मोटरसायकलच्या साह्याने अवैध देशी दारूचे खोक्याचे बॉक्स गावामध्ये पोज नेऊन टाकण्यात येते संबंधित अधिकाऱ्यांचा कानाडोळा करतात नेमके कारण समजायला मार्ग नाही यांच्यावर कारवाई होईल का नाही, असे नागरिकांमध्ये चर्चा आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर